बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १६२ वा | गुरूवार दिनांक ०४ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### सुपारीच्या पोत्याची अज्ञाताने केली चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे विठ्ठल सठवाजी लोंढे, वय ५० वर्षे, रा.लातुर यांचे संजय देसमाने यांचे एमआयडीसी येथील गोडावून मध्ये ठेवलेले ७९८ कच्च्या सुपरीच्या पोते एकुण ७१,००० किंमतीचे हे दि.२४.०६.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विठ्ठल लोंढे यांनी दि.०२.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (१),३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### घरातील सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी दयानंद प्रकाश चौगुले, वय ४८ वर्षे, रा.हंगरगा नळ ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे राहते घरात अज्ञात व्यक्तीने दि.०१.०९.२०२५ रोजी प्रवेश करुन घरातील कपाटातील १३५ ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख रक्कम १,००,००० असा एकुण ३,७०,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दयानंद चौगुले यांनी दि.०२.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### भोत्रा शिवारातून मोटारीची चोरी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-प्रमारुती ज्ञानदेव शेळके, वय ६२ वर्षे, रा.भोत्रा शेळके वस्ती ता.परंडा जि. धाराशिव यांची अंदाजे १०,००० किंमतीची क्राटेक्स कंपनीची ७.५ पाच एचपी ची मोटर ही दि.२४.०८.२०२५ रोजी भोत्रा शिवारतील सिना नदीवरील बांधकामजवळून दादा घुले यांचे शेत गट नं ४३ मधून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रमारुती शेळके यांनी दि.०२.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### लग्नाचे अमिष दाखवुन केलालैंगीक अत्याचार

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील २३ वर्षीय मुलगी दि. १८.१२.२०१९ ते एप्रिल २०२५ पावेतो एका गावातील एका तरुणाने नमुद मुलीस लग्नाचे अमिष दाखवून नमुद तरुणाने तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. या दरम्यान नमुद तरुणाने सदर घटनेचे मोबाईलवर छायाचित्रण करून प्रसारीत करण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेचे आईने दि.०२.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४ सह पोक्सो कलम ४, ८, १२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## सक्रिय लोकसहभागामुळेच हरित धाराशिवची गिनीज बुकमध्ये नोंद, श्री बाल हनुमान गणेश मंडळाच्या आरतीचा जिल्हाधिकाऱ्यांना मान



धाराशिव(प्रतिनिधी)- सामाजिक संघटना, मंडळे अन् विविध संस्थांचे प्रशासनास कृतिशील पाठबळ मिळाले, त्यामुळे हरीत धाराशिवची गिनीज बुक ऑफ वर्ल्डमध्ये झाली आहे. गिनीज बुकात नोंद होण्यापर्यंतचा प्रवास हा केवळ जिल्हा प्रशासनासोबतला सहकार्य करणाऱ्या सामाजिक मंडळामुळे शक्य झाले. आपले मंडळ या धाराशिव जिल्ह्यातील जुने मंडळ आहे. परंतु मंडळाचे नाव जरी बाल हनुमान गणेश मंडळ असले तरी आता हे मंडळ आता बाळ राहिले नाही, ते ज्येष्ठ झाले असून, आपली आता अधिक जबाबदारी वाढली आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती पुजार यांनी केले.

धाराशिव शहरातील गवळी गल्लीतील श्री बाल हनुमान गणेश मंडळाच्या श्रींची आरती जिल्हाधिकारी कीर्ती पुजार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांच्या हस्ते करण्यात आली. या वेळी ते बोलत होते. या वेळी जिल्हाधिकारी कीर्ती पुजार यांचा व मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांचा मंडळाच्या वतीने प्रा. गजानन गवळी, मनमत पाळणे, काशिनाथ दिवटे, डॉ. नायगावकर यांच्या हस्ते मंडळाच्या श्रींची प्रतिमा देऊन करण्यात आला. शोभेची दारू व फटाक्याच्या आतषबाजीमध्ये व गणपती बाप्पा मोरया, छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो, छत्रपती संभाजी महाराजांचा विजय असो, हर हर महादेव अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. या वेळी डॉ. घोष यांनी आपल्या मनोगतात मंडळाच्या १० दिवसांच्या कालावधीतील विविध उपक्रम राबवणारे मंडळ आहे. सामाजिक सेवा करणाऱ्या ज्येष्ठापासून बालकांचा मला अभिमान वाटतो. सूत्रसंचालन निवृत्त प्राचार्य भालचंद्र हुच्चे यांनी केले. आभार राजकुमार दिवटे यांनी मानले.

६१ वर्षांपासून अखंडपणे मंडळाने जपले समाजसेवेचे व्रत; किल्ले संवर्धनासाठी दिले निधी धाराशिव शहरातील गल्लीतील श्री बाल हनुमान गणेश मंडळाने गणेशोत्सवात विविध समाजाभिमुख उपक्रम राबवत ६१ वर्षांपासून विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांची दखल घेतली आहे. यासाठी प्रत्येक वयोगटातील सदस्या यासाठी कठोर परिश्रम घेत असल्याने ६१ वर्षापासून अखंडपणे मंडळाने समाजसेवेचे व्रत जपले आहे. यामध्ये सीमेवरील जवानांना राख्या पाठवून प्रेरणा दिली, किल्ले संवर्धनासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाला निधी दिला गणेश उत्सवास राज्य महोत्सवाचा दर्जा मिळावा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मंडळ कार्य करीत आहे.

## गणेशोत्सवासाठी कोकणात गेलेल्या १५० बस परतल्या: ग्रामीणच्या फेऱ्याही वाढल्याने प्रवाशांची कसरत थांबली

धाराशिव (प्रतिनिधी)-कोकणातील सर्वात मोठा उत्सव गणेशोत्सव असल्याने चाकरमान्यांना आपल्या कोकणात घरी वेळेत पोहोचवण्यासाठी परिवहन महामंडळाने राज्यातील विविध विभागांतून जवळपास ५००० बस मुंबईला मागवल्या होत्या. धाराशिव विभागातून दि. २५ ऑगस्टपासून १९० बसेस टप्प्याटप्प्याने मुंबईला मार्गस्थ झाल्या होत्या. तेथून मुंबई, ठाणे, रत्नागिरी, मंडणगड, पनवेलसह कोकणातील अन्य ठिकाणी गणेशभक्तांना पोहोचवून १९० बसेसपैकी १५० बस जिल्ह्यात परतल्या आहेत. आता केवळ धाराशिव विभगातील केवळ ५० बस कोकणात आहेत. त्यासाठी धाराशिव विभागातून १०० एसटी चालक-वाहक पुन्हा रवाना झाले आहेत. एसटी बस कोकणातील चाकरमान्यांना कोकणात गणेशोत्सवासाठी घेऊन जातात. गतवर्षी १९० एसटी बस गणेशोत्सवासाठी धाराशिवमधून पाठवल्या होत्या. यावर्षीही १९० बस मुंबईला गेल्या होत्या. कोकणात पाच दिवसांच्या गणेश विसर्जनानंतर २ सप्टेंबरनंतर धाराशिव विभागातील एसटी बस परतीचा प्रवास सुरू झाला.

त्यामुळे गत आठवड्यातील धाराशिव जिल्ह्यात ग्रामीण भागासह काही पुणे, लातूर, हैद्राबाद, नाशिक मार्गावरील बस फेऱ्यांची कसरत आता थांबणार आहे. आगार बस संख्या धाराशिव ३५ उमरगा ३४ भूम ३० तुळजापूर ३६ कळंब ३५ परंडा २० एकूण १९० डहरीश ुळींह षरलशलेज्ञ धाराशिव-मुंबई, धाराशिव-कोल्हापूर,धाराशिव- ठाणे, धाराशिव-हैद्राबाद, धाराशिव-पुणे, (सकाळी, दुपारी, रात्री) लातूर- धाराशिव-भिवंडी, धाराशिव -छत्रपती संभाजीनगर या बस पूर्ववत झाल्या. ऐन गौरी-गणपतीच्या सणात जिल्ह्यातील १९० एसटी बस कोकणात गेल्या होत्या. धाराशिव एसटी विभागातील धाराशिव, उमरगा, भूम, परंडा, तुळजापूर, कळंब येथील एकूण ५७० बसफेऱ्या रद्द कराव्या लागल्या होत्या.

## बंजारा समाजाच्या पेहरावात साकारल्या गौरी; धाराशिवच्या राठोड कुटुंबीयांनी साकारला अनोखा देखावा



धाराशिव (प्रतिनिधी)- सणासुदीत विशेष म्हणजे गणेशोस्तव आणि गौरी पूजन काळात घरोघरी गौरी पूजन केले. या निमित्ताने बालाजी नगर येथील राठोड कुटुंबीयांनी आपल्या घरात बंजारा समाजाच्या पेहरावात लक्ष्मी मूर्ती साकारल्या आहेत. त्यांच्या या वैविध्यपूर्ण गौरी आणि गणपती बाप्पाचे संपूर्ण जिल्हावासियानी लक्ष वेधले आहे.

धाराशिव शहरातील बालाजी नगर येथील नामदेव राठोड यांनी आयुष्यभर एस्टी महामंडळात सेवा केली. सेवावृत्तीचे आणि विविध कौशल्याचे बळ तेव्हापासून त्यांच्या अंगी होते. त्यांच्या कुटुंबातील पत्नी शाहुबाई राठोड, पुत्र विकास राठोड, आकाश राठोड, आई ताईबाई राठोड यांनी यावर्षी प्रथमच आपल्या घरात बंजारा समाजाच्या पेहरावात लक्ष्मी मूर्ती साकारण्याचा निर्णय घेतला.

ठरल्याप्रमाणे त्यांनी लक्ष्मी मूर्तीच्या पेहरावसाठी लागणाऱ्या साहित्याची जमवाजमव केली. त्यासाठी आवश्यक असणारी चवली, पावली, काचेचे तुकडे आणि इतर साहित्य जमा करून हुबेहुब बंजारा समाजाच्या महिला जसा पारंपरिक पद्धतीने पेहराव करतात त्याप्रमाणे गौरीची वेशभूषा साकारली आहे.

गौरीच्या माथ्यावर बंजारा समाजातील पारंपरिक घुंघट, काथळी आणि फेट्या म्हणजेच राजस्थानी भाषेतील घागरा चोळी असा सुंदर पेहराव या कुटुंबाने यावर्षी प्रथमच सादर केला आहे. त्यामुळे हा देखावा सर्व बंजारा समाजातील कुटुंबीयांसह धाराशिव जिल्हावासियांचे लक्ष वेधून घेत आहे.

## वॉटर शेडच्या पाणी पुस्तिकेचे प्रकाशन

### पाणी व स्वच्छता माहिती पुस्तक प्रत्येक गावात देणार- सीईओ डॉ.मैनाक घोष



धाराशिव (जिमाका) वॉटर शेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या माध्यमातून जिल्ह्यात पाणी, स्वच्छता,शिक्षण,आरोग्य व रोजगार या बाबींवर काम करण्यात येत आहे.याबरोबरच पाणी व स्वच्छते संदर्भात वॉटर शेडने तयार केलेल्या पाणी व स्वच्छता माहिती पुस्तिकेमध्ये आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची माहिती संकलित केलेली आहे.त्यामुळे ते पुस्तक जिल्ह्यातील प्रत्येक गावांसाठी उपयुक्त असून त्या पुस्तकाच्या प्रती जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये वितरित करणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनाक घोष यांनी आज २ सप्टेंबर रोजी केले.

जिल्हा परिषदेच्या कै यशवंतराव चव्हाण सभागृहात वॉटर शेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्यावतीने तयार करण्यात आलेल्या पाणी व स्वच्छता या पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.घोष यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ.घोष पुढे म्हणाले की,शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या पिण्याचे पाणी प्रत्येकाला स्वच्छ मिळेल यासाठी प्रयत्न करावेत.तर स्वच्छता संदर्भात सर्व नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेण्यासह शौचालयाचा वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे घराची स्वच्छता करण्यासह परिसर व पर्यायाने संपूर्ण गावाची स्वच्छता केल्यास गावातील प्रत्येक नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनोज राऊत,ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता कटकदौंड,उपकार्यकारी अभियंता बप्पासाहेब ढवळे,उपअभियंता नरेंद्र भुसारे,दत्तात्रय पाचंगे,अरविंद सिद्राल,एस के शिंदे (यांत्रिकी) पवार (देखभाल दुरुस्ती),वाटर संस्थेचे प्रतिनिधी आदेश ठोंबरे यांच्यासह शाखा अभियंता अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चंद्रग्रहणावेळी तुळजाभवानी मातेला सोवळ्यात ठेवणार : रविवारी रात्री विधीच्या वेळेत बदल

तुळजापूर (प्रतिनिधी)-चंद्रग्रहणाच्या पार्श्वभूमीवर रविवारी (दि. ७) रात्री तुळजाभवानी मातेचा धार्मिक विधीचा वेळेत बदल करण्यात आला आहे. यामध्ये रविवारी रात्री ९:५७ ते १:३० या ग्रहण कालावधीत तुळजाभवानी मातेला सोवळ्यात ठेवण्यात येणार आहे.

भाद्रपद शुद्ध पौर्णिमेला म्हणजेच रविवारी (दि. ७) रात्री चंद्रग्रहण असल्याने ग्रहणकालावधीत रविवारी रात्रीचा देवीच्या नित्योपचार धार्मिक पूजा विधीत बदल करण्यात आला आहे. तसेच ग्रहण सुटल्यानंतर सोमवारी (दि. ८) पहाटे ०१:३० वाजता नित्यपूजेची घाट होऊन अभिषेक पूजेला प्रारंभ होणार आहे. अभिषेक पूजाविधीनंतर देवीस महावस्त्र, अलंकार घालण्यात येऊन धुपारती होईल. विशेष म्हणजे रविवारी रात्र भर मंदीर खुले राहणार आहे. रात्री ०९:३० वा. देवीचा चरणतीर्थ पूजेनंतर मंदीर उघडण्यात येईल. रात्री ०९: ४५ वाजता पूजेची घाट होऊन निर्माल्य विसर्जन करण्यात येईल. तर ०९:५७ ०१:३० या ग्रहण कालावधीत तुळजाभवानी मातेला शुभ्र श्वेत वस्त्रामध्ये सोवळ्यात ठेवण्यात येणार आहे. रविवारी सायंकाळी ६.३० वाजता अभिषेक पूजेची घाट होऊन अभिषेक पुजेस प्रारंभ होणार आहे. यावेळी केवळ सायंकाळचा ०२ सिंहासन पूजा घालण्यात येतील. रात्री ०७:३० वाजता अभिषेक पूजा संपवण्यात येणार आहे. रात्री ०७:३० ते ०८ या कालावधीत आरती, धुपारती रात्री आठ वाजता पौर्णिमानिमित्त छबीना मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री ८:३० ते ९:३० वाजेपर्यंत जोगवा व प्रक्षाळ पूजेनंतर मंदिर बंद करण्यात येणार आहे.

## जीवन दानातील अनमोल असे देहदान.. अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहाण यांच्या हस्ते देहदात्याचा अर्ज दाखल



धाराशिव (प्रतिनिधी)- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव येथे मौजे धामणगाव ता.बार्शी जि.सोलापुर येथील रहिवाशी विभीषण गजरंग कदम यांनी मरणोत्तर देहदान करण्याचा निर्णय घेऊन आज रोजी अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहाण यांच्या हस्ते देहदानाचा अर्ज दाखल केला,देहदात्याचे नातलग राजर्षी नामदेव कदम होत्या,देहदान हे पवित्र असे दान असुन रक्तदाना प्रमाणेच जीवनदान देण्याचे हे कार्य आहे, देहदान जीवन दानातील अनमोल असे देहदान होय,देहदाते सह त्यांचे नातेवाईकांचे अधिष्ठाता डॉ शैलेंद्र चौहाण व जीएमसी सुरक्षा समितीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले,यावेळी अधिष्ठाता डॉ शैलेंद्र चौहाण,डॉ.नोमण शेख,जीएमसी सुरक्षा समिती सदस्य गणेश वाघमारे, आरोग्य मित्र शेख रौफ,देहदाते बिभीषण कदम, राजर्षी कदम,तर शरीरशास्त्र विभाग मधील डॉ.स्वाती पांढरे - एचओडी (विभाग प्रमुख),डॉ.सुवर्णा आनंदवाडीकर - सहयोगी प्राध्यापक,डॉ. अरबाज ढवळीकर - आरएमओ (निवासी वैद्यकीय अधिकारी) सह इतर उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भारताचे योग्य पाऊल

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी धाडसी निर्णय घेत अमेरिकेला चांगलेच गप्प बसून हात दाखविला आहे. अमेरिकेने पंचवीसटक्के टैरिफ लावला तो सर्व जगात असल्याने भारत गप्प राहीला परंतु अमेरिकेने पन्नासटक्के करताच संताप व्यक्त निर्माझ झाला. केवळ भारताला आडचणीत आणणे हा एकमेव कार्यक्रम दिसून येत होता. भारत पुर्वी पासून रशियाकडून कच्चे तेल खरेदी करीत आला होता. अमेरिका व रशियाचे वाकडे असल्याने त्याचा राग भारतावर काढला गेला किंवा इतराकडून तेल खरेदी करावे असा विचार होता. त्यामुळे दबाब तंत्राचा वापर अमेरिकेने केला. याला भारताने न जुमानता थेट स्वदेशीचा नारा दिला. भारतीय उत्पादनाकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. त्यामुळे भारतीय उद्योगांना चालना मिळणार आहे. एवढ्यावर न थांबता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी रशियासोबत पुर्वी सारखे संबंध ठेवले. चीन सोबत बोलणीही सुरू केली. चीन देशाला भेट दिली, मात्र अमेरिका हा धुर्त असल्याने चीनला गोंजारत होता. भारताविरोधात भडकावत होता. अशा स्थितीत भारताने अधिक भाव अमेरिकेस न देता रशिया व चीनशी बोलणी चालू ठेवली. त्यातच अमेरिकीन न्यायालयाने ट्रम्प यांना मोठा चपराक दिला. पन्नासटक्के टैरिफ लावण्याचा अधिकार नसल्याचे म्हटले. त्यातच अमेरिकेचे अर्थतज्ज्ञांनी सुद्धा ट्रम्प यांचा निर्णय चुकीचा असल्याचे म्हटले. सर्वत्र ट्रम्प यांच्यावर दबाव आल्याने ट्रम्प नरमले असले तरी त्यांच्यात तसा कायम बदल होत नाही. कालानुसार वक्तव्य करीत असतात. सतत बदलणारा त्यांचा स्वभाव आहे. अशा स्थितीत भारताने कायम भुमिका रशियाशी मैत्रीची ठेवल्याने तेलाच्या किंमती कमी केल्या आहेत. त्यामुळे भारतात आता पेट्रोल म्हणजे इंधनाचे दर कमी होण्याची शक्यता आहे. भारताने आता तर जीएसटीमध्ये बदलाचे संकेत दिले असून या बाबत बैठका होत आहेत. याचा परिणाम सकारात्मक होणार असून महागाई कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारताने आज जी भुमिका घेतली ती सकारात्मक आहे. भारताने टैरिफ कमी करा अशी विनवणी केली नाही उलट आलेल्या संकटावर कशा प्रकारे मात करता येईल याचा विचार केला आहे. सतत भारतावर दबाब टाकणे अशक्य ट्रम्प यांना वाटणे स्वाभाविक आहे. ट्रम्प यांनी भारताचे जे मित्र नाहीत असा देश पाकिस्तान व चीन आहे यांना गोंजरण्याचे काम करीत आहे. पाकिस्तानमध्ये खणीज तेलाच्या खाणी असल्यातरी त्यावर प्रक्रिया करणारे कारखाने व तेलसाठ्यासाठी तयार करणारे मोठे बॅलर उभा करणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. पाकिस्तानची आर्थिकस्थिती समाधानाची नाही. त्यामुळे भारताचे मोठे नुकसान करण्याची क्षमता नाही हे उघड आहे. तरी एक ना एक दिवस पाकिस्तानकडून भारताला तेल खरेदी करावे असे बालिश वक्तव्य ट्रम्प यांनी केले आहे. भारताचा मित्र रशिया आहे तरी भारत आता चीन बरोबर संबंध वाढवित आहे असे दिसून येत आहे. असे जरी असले तरी चीन बरोबर संबंध ठेवताना विचार करावा लागणार आहे कारण गलवान खोऱ्यातील चकमकीनंतर भारत-चीन संबंध बिघडले. ते पूर्ववत करण्याच्या दिशेने आताही ठोस पावले टाकली जात आहेत. उभय देशांनी एकत्र येऊन विकासाच्या संधी साधाव्यात, एका दिशेने एकत्र वाटचाल केल्यास द्विपक्षीय संबंध दीर्घकाळासाठी दृढ होतील, असे उद्‌गार जिनपिंग यांनी परिषदेच्या पार्श्वभूमीवर काढले. यापूर्वी चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी भारत दौऱ्यात परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशी झालेल्या चर्चे नंतर सीमाभागातील तीन मार्गांवरून व्यापार पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली होती. उत्तराखंडमधील लिपुलेख, हिमाचल प्रदेशातील शिपको ला आणि सिक्कीममधील नाथूला हे ते तीन नियुक्त मार्ग होत. यापैकी लिपुलेख खिंड हा नेपाळच्या सार्वभौम प्रदेशाचा भाग आहे, असा आक्षेप नेपाळने घेतला. त्यामुळे याबाबत वाद भारताचा चीनशी नव्हे, तर नेपाळशी झाला. लिपुलेख खिंड ही भारत, नेपाळ आणि चीनच्या त्रिसीमा क्षेत्रात स्थित एक हिमालयीन खिंड आहे. कैलास पर्वत आणि मानसरोवर पवित्र स्थळांकडे जाणारा हा एक महत्त्वाचा मार्ग. धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या ही खिंड भारतासाठी महत्त्वाची. याबाबत भारताने नेपाळचे सर्व आक्षेप सार्थपणे फेटाळून लावले आहेत. आता भारत-चीन संबंधांमध्ये सातत्याने प्रगती होण्यासाठी सीमावर्ती भागात शांतता राहणे महत्त्वाचे आहे, हे मोदी यांनी स्पष्ट केले आहे. चीनच्या प्रेमात भारत वाहत जाणार नाही, तर सावधपणे संबंध वाढवत नेले जातील, हेच पंतप्रधानांनी या दौऱ्यात अधोरेखित केले. थेट विमानसेवा, व्हिसा सुविधा, कैलास मानसरोवर यात्रेद्वारे नागरिकांमधील संबंध वाढवण्याची गरजही यानिमित्ताने व्यक्त झाली. व्यापार, गुंतवणुकीत वाढ करण्याची आणि व्यापार तूट कमी करण्याची हमी चीनने दिली. आज भारत ज्या प्रमाणात चीनकडून माल आयात करतो, त्या प्रमाणात चीन भारताकडून आयात करत नाही. हे चित्र बदलायला हवे. पंतप्रधान मोदी यांनी भारतात पुढील वर्षी होणाऱ्या ब्रिक्स परिषदेचे निमंत्रण जिनपिंग यांना दिले आहे. ट्रम्प यांनी सध्या भारतविरोधात भूमिका घेतली असल्यामुळे आपण लगेच चीनची गळाभेट घेत आहोत, असे नाही. आणि तसे ते असताही कामा नये. याचे कारण अद्यापही चीन पाकिस्तानला झुकते माप देतो आहे. नुकतेच पाकिस्तानला चीनकडून मिळालेल्या लढाऊ पाणबुडीचे जलावतरण वांग यी यांच्या हस्ते झाले. चीनसोबतचा जुना इतिहास लक्षात ठेवून भारताने चीनशी डोळे उघडे ठेवून मैत्री केली पाहिजे! भारताला अमेरिकाच त्रास देते असे नाही तर पाकिस्तान सह बांगला देश आदि त्रास देणार आहेत. त्यामुळे स्वदेशीमालास प्रोहत्सान देण्यासाठी भारताचे पावुल योग्य आहे. जीएसटीत सुधारणा करणे आवश्यक आहे. त्या बाबी योग्य आहेत ते उचलले जात आहे. त्यामुळे आगामी काळात सर्वांशी संबंध विचारपुर्वक ठेवणे काळाची गरज आहे. ट्रम्प यांच्यावर विश्वास ठेवताना अनेकदा विचार करणे काळाची गरज आहे.

# गणेश विसर्जन मिरवणूक मार्गाचे मनपा आयुक्त श्रीमती मानसी सह अधिकाऱ्यांकडून पाहणी

**लातूर/प्रतिनिधी :** शनिवार दि. ६ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन होणार आहे.यानिमित्त मनपा अधिकाऱ्यांनी विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी केली.

मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या सूचनेनुसार उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी गंजगोलाई, सुभाष चौक, खडक हनुमान,तेली गल्ली, सिद्धेश्वर मंदिर या मार्गाची चालत जाऊन पाहणी केली.दरवर्षी मनपाच्या वतीने शहरात १५ ठिकाणी व विमानतळ परिसरात मूर्ती संकलन केंद्र उभारले




जाते. यापैकी खंदाडे नगर, शासकीय कॉलनी, बांधकाम भवन येथील मूर्ती संकलन केंद्र परिसराचीही डॉ.खानसोळे यांनी पाहणी केली.

मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी समाधान सूर्यवंशी, विजय राजुरे, विद्युत विभाग प्रमुख जरीचंद ताकपिरे,अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी, प्रमुख स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, अक्रम शेख, धोंडीबा सोनवणे, शिवराज शिंदे यावेळी उपस्थित होते.

विसर्जन मिरवणूक मार्गावर तसेच संकलन केंद्र परिसरात स्वच्छता करावी तसेच मिरवणूक मार्गावर येणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडण्याच्या सूचना यावेळी उपायुक्तांनी केल्या. रस्त्यावरील खड्डे बुजविणे, विद्युत व्यवस्था, विजेच्या तारा यांचीही त्यांनी पाहणी केली. मागील काही वर्षापासून शहरातील नागरिक आपल्या घरी स्थापन केलेल्या गणेश मूर्ती संकलन केंद्रावर आणून देत आहेत. शहरातील नागरिकांनी यावर्षीही या उपक्रमास सहकार्य करत आपल्या गणेश मूर्ती संकलन केंद्रावर आणून देण्याचे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना ‘एनर्जी लीडरशिप अ‍ॅवॉर्ड’

**मुंबई/प्रतिनिधी :** महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांना इंग्लंडच्या ‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’तर्फे ऊर्जा क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल नुकताच ‘एनर्जी लीडरशिप अ‍ॅवॉर्ड २०२५’ प्रदान करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन चालू असून त्यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामामुळे हा सन्मान झाला आहे. महावितरणच्या कामगिरीत राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या पुरस्काराचे श्रेय महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे, असे मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले.

वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे प्रमुख पाब्लो स्टॅन्ले व अध्यक्ष हेन्री आर. यांच्या स्वाक्षरीने मा. लोकेश चंद्र यांना पुरस्कारस्वरूप प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. ‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’ ही इंग्लंडमधील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे.

प्रशस्तीपत्रात म्हटले आहे की, ऊर्जा क्षेत्रातील असामान्य नेतृत्व, प्रशासनातील दूरदृष्टी आणि महाराष्ट्राच्या वीजवितरण क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल मा. लोकेश चंद्र यांना एनर्जी लीडरशीप



अ‍ॅवॉर्ड २०२५ प्रदान करण्यात येत आहे. कार्यक्षमता, कल्पकता आणि सेवेबद्दलच्या समर्पित वृत्तीमुळे मा. लोकेश चंद्र यांनी अक्षय्य ऊर्जेच्या वापराला चालना देण्यासोबतच लाखो नागरिकांना भरवाशाचा वीज पुरवठा करण्यात प्रमुख भूमिका बजावली आहे.

अक्षय्य ऊर्जेचा वापर करून वीजखरेदी खर्चात मोठी बचत करून वीजदरात कपात करण्याची ऐतिहासिक कामगिरी महावितरणने केली आहे. अशा प्रकारे वीजदरात कपात करणारी महावितरण ही देशातील पहिलीच सार्वजनिक वीज वितरण कंपनी आहे. पुढील पाच वर्षात वीज खरेदीमध्ये अक्षय्य ऊर्जेवर भर दिल्यामुळे महावितरणची सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने पाच वर्षे वीजदरात कपात शक्य झाली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीत मा. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर ४५ लाख कृषी पंप चालविण्याची ही १६,००० मेगावॅट क्षमतेची गेम चेंजर योजना आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती योजनेमध्ये राज्यातील ग्राहकांनी नुकताच एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला. महाराष्ट्रात या योजनेची अंमलबजावणी महावितरण करत आहे.

शेतकऱ्यांना हक्काची सिंचन व्यवस्था मिळण्यासाठी शेतात सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने देशात सर्वाधिक पंप बसविले आहेत.

# देशभरात ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉनचे आयोजन – केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडविया



**मुंबई/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त १७ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा देशभरात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत युवकांमध्ये क्रीडाप्रेम जागविण्यासाठी व निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी देशभरातील ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिली.

या संदर्भात झालेल्या दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत डॉ. मांडविया यांनी राज्यांच्या क्रीडा मंत्र्यांशी संवाद साधला. यावेळी केंद्रीय युवा कार्य व क्रीडा विभागाचे सचिव हरिरंजन राव उपस्थित होते. राज्याचे क्रीडा मंत्री अ‍ॅड. माणिकराव कोकाटे यांच्यासह विविध राज्यांचे क्रीडा मंत्रीही उपस्थित होते.

मंत्री डॉ. मांडविया म्हणाले की, युवकांचे आरोग्य सक्षम ठेवणे आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेम जागवणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे या कार्यक्रमांना प्रत्येक राज्याने सक्रिय सहभाग देऊन यशस्वी करावे.

या पंधरवड्यात २१ सप्टेंबर रोजी ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉनचे आयोजन करण्यात येणार आहे. तर, यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर : एकतेचा संदेश देणाऱ्या पदयात्रेचे आयोजन देशभर करण्यात येणार आहे. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यांत तीन दिवस एकता, राष्ट्रप्रेम, एक भारत श्रेष्ठ भारत व विकसित भारत यांचा संदेश देणाऱ्या पदयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे.

दरम्यान, नशा मुक्त भारत अभियान राबविण्यात येणार आहे.

# गडांचा राजा : राजगड

सह्याद्रीच्या उंच डोंगररांगांच्या कुशीत उभा असलेला, भव्यता आणि ऐतिहासिक वैभव यांचा अद्वितीय संगम म्हणजे राजगड! छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीतील पहिला भक्कम पाया या गडाने घातला. तब्बल पंचवीस वर्षे स्वराज्याची राजधानी म्हणून राजगडाने अनेक ऐतिहासिक घटना, शौर्यगाथा, राजकीय निर्णय आणि युद्धांचा साक्षीदार होण्याचा मान मिळवला. मराठ्यांच्या पराक्रमाला व स्वराज्याच्या कर्तृत्वाला दिशा देणारा हा गड, केवळ एक किल्ला नसून स्वराज्याच्या आत्म्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

राजगड किल्ल्यावर पोहोचण्याचा प्रवास रोमांचकारी आहे. दाट जंगलातून जाणाऱ्या पायवाटा, खडतर चढण आणि सह्याद्रीच्या निसर्गसौंदर्याचा आनंद यामुळे हा प्रवास अविस्मरणीय ठरतो. गडावर पोहोचल्यानंतर दिसणारे विस्तीर्ण पर्वत आणि खोल दऱ्यांचे विहंगम दृश्य थकवा दूर करून मन भारावून टाकते. इतिहास, साहस आणि निसर्ग यांचा अद्भुत संगम राजगडावर अनुभवता येतो. हा किल्ला केवळ एक पर्यटनस्थळ नाही, तर मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाचे दार आहे. इथली शांतता, प्राचीन वास्तू आणि डोंगरमाथ्यावर वाहणारा गार वारा प्रत्येकाला पुन्हा-पुन्हा येथे येण्यासाठी प्रेरित करतो.

**प्राचीन इतिहास**

आजचा राजगड किल्ला मुळात ‘‘मुरुंबदेव‘‘ या नावाने ओळखला जात होता. विविध राजवटींच्या अखत्यारीत असताना या ठिकाणी फक्त बालेकिल्ल्याचा भाग अस्तित्वात होता. परंतु इ.स. १६४३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेताच त्याचे पुनर्निर्माण सुरू झाले. तेव्हाच या गडाला ‘‘राजगड‘‘ म्हणजेच गडांचा राजा हे साजेसे नाव लाभले आणि स्वराज्याची राजधानी म्हणून तो घोषित करण्यात आला.

या गडावर अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. इथेच शिवाजी महाराजांचे सुपुत्र राजाराम यांचा जन्म झाला. त्यांची पत्नी सईबाई यांचे याच ठिकाणी दुःखद निधन झाले. १६६४ मध्ये सूरत लुटल्यानंतर मिळालेल्या संपत्तीचे संरक्षण याच गडावर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक महत्त्वाच्या लढायांची रणनीती राजगडावर आखली. भक्कम तटबंदी, मजबूत बुरुज आणि चतुराईने बांधलेल्या रचना यामुळे हा किल्ला अभेद्य बनला. मुघल आणि आदिलशाही सैन्याने कित्येक वेळा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला.

आजही राजगड हा इतिहास, साहस आणि निसर्ग सौंदर्याचा संगम आहे.




पर्यटनासाठी हा किल्ला एक उत्तम ठिकाण आहे. किल्ल्यावरील सुवेळा माची, संजीवनी माची आणि बालेकिल्ला ही विशेष आकर्षणाची ठिकाणे. राजगडावरून दिसणारे सह्याद्रीचे डोंगर आणि धुके भरलेले निसर्गदृश्य मन मोहून टाकतात. इतिहासप्रेमी, साहसिक पर्यटक आणि निसर्गप्रेमी यांच्यासाठी राजगड एक अनोखा अनुभव देणारे ठिकाण आहे.

नैसर्गिक रचना आणि संरक्षण व्यवस्था

राजगड किल्ला मध्ययुगीन स्थापत्यकलेचा अद्वितीय नमुना आहे. सुमारे ४० किलोमीटर परिघ असलेल्या या किल्ल्याची समुद्रसपाटीपासून उंची १३७६ मीटर आहे. भक्कम तटबंदी आणि सुयोग्य रचना यामुळे हा किल्ला संरक्षण आणि प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला.

या किल्ल्याचा मध्यभाग पद्मावती माची म्हणून ओळखला जातो. येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे निवासस्थान होते. पद्मावती देवीचे मंदिर, पद्मावती तलाव आणि राजवाड्याचे अवशेष येथे पाहायला मिळतात. ही माची केवळ निवासासाठीच नव्हे, तर सैन्याच्या हालचालींसाठीही अत्यंत महत्त्वाची होती.

किल्ल्याच्या पश्चिमेला संजीवनी माची आहे. येथे तीन स्तरांमध्ये बांधलेली तटबंदी आजही मराठ्यांच्या लढाऊ कौशल्याची साक्ष देते. शत्रूच्या हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी ही संरचना अत्यंत उपयुक्त ठरली. पूर्व बाजूला सुवेळा माची आहे. येथून दिसणारे निसर्गसौंदर्य विलोभनीय आहे. याच ठिकाणी ‘‘नेढे’’ नावाची मोठी नैसर्गिक दगडी कमान आहे. हा भूशास्त्रीय चमत्कार किल्ल्याच्या सौंदर्यात भर घालतो. बालेकिल्ल्यावरून सह्याद्री पर्वतरांगेचे अप्रतिम दृश्य दिसते. पूर्वी येथे राजवाडा होता आणि याच ठिकाणी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असत.

राजगडाची भौगोलिक व लष्करी रचना अतिशय अद्वितीय आहे. किल्ला डोंगरांच्या उंचसखल उतारांवर बांधलेला असल्याने तो जिंकणे जवळजवळ अशक्य होते. एका सरळसरळ तटबंदीवर अवलंबून न राहता तीन प्रमुख माच्या पद्मावती, संजीवनी आणि सुवेळा या गडाला त्रिसूत्री स्वरूपात जोडलेल्या आहेत. या प्रत्येक माचीचा आपापला वेगळा उपयोग होता :

पद्मावती माची गडाचे हृदय मानली जाणारी ही माची प्रशासनिक व निवासी केंद्र होती. येथे राजसदर, पद्मावती देवीचे मंदिर, महाराजांचे निवासस्थान, राणीवसा तसेच मंत्र्यांचे निवासस्थान यांचा समावेश होता. मोठमोठ्या पाण्याच्या टाक्यांमुळे या माचीवर वर्षभर पाणी उपलब्ध असे.

संजीवनी माची पश्चिमेकडे पसरलेली ही माची मजबूत तटबंदी, अर्धगोलाकार बुरुज आणि पहारेकऱ्यांसाठी सोयीस्कर स्थानांनी युक्त होती. संरक्षण आणि आक्रमण अशा दोन्ही दृष्टींनी ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असे.

सुवेळा माची पूर्वेकडे असलेली ही माची अरुंद व उग्र कड्यांवर पसरलेली आहे. येथे पाण्याची टाकी, पहारेकऱ्यांची ठाणी आणि गुप्त, अरुंद प्रवेशद्वार होते. शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी हे स्थान अनन्यसाधारण उपयोगी ठरत असे.

या तिन्ही माच्या एका ठिकाणी येऊन मिळतात तो म्हणजे बालेकिल्ला. उंच मनोरे, भक्कम भिंती आणि विस्तीर्ण परिसरावर नजर ठेवणारा हा भाग म्हणजे गडाचा सर्वोच्च आणि अंतिम संरक्षणस्तर. गडाच्या प्रवेशासाठी पाली, गुंजवणे व अळू दरवाजा हे मार्ग वापरले जात. तसेच खडकात कोरलेल्या असंख्य टाक्यांमुळे पाणी व धान्यसाठा अखंड उपलब्ध राहावा याची काळजी घेण्यात आली होती.

**गडाचे वैशिष्ट्य**

राजगडाच्या बांधणीत केवळ संरक्षणाचा विचार केलेला नव्हता, तर राजकारण, प्रशासन, सैनिक व्यवस्थापन आणि दीर्घकालीन टिकाऊपणा या सर्व बाबी लक्षात घेऊन गड उभारण्यात आला. वळणावळणाच्या पायवाटा, धान्यकोठारे, पहारेकऱ्यांच्या चौक्या यामुळे गड एक परिपूर्ण राजधानी ठरला.

**सांस्कृतिक वारसा**

आजचा राजगड हा फक्त एक पुरातन अवशेष नाही, तर जिवंत वारशाचे प्रतीक आहे. येथे होणारे उत्सव गडाच्या ऐतिहासिक महत्त्वाची आठवण करून देतात. दिवाळीच्या वेळी होणारा दीपोत्सव संपूर्ण गडाला दिव्यांच्या उजेडात न्हाऊ घालतो. शिवजयंतीच्या दिवशी तर हजारो लोक गडावर जमतात. पारंपरिक वाद्ये, भाषणे, शिवचरित्रावर आधारित नाटिका यामुळे गड पुन्हा एकदा इतिहासाच्या सोनेरी क्षणात जगू लागतो.

**जागतिक ओळख**

इतिहास, वास्तुकला, युद्धतंत्र आणि सांस्कृतिक महत्त्व यांचा अनोखा संगम असलेला राजगड आज युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या मालिकेत समाविष्ट होऊन भारताचे आणि मराठ्यांचे वैभव जगभर पोचवत आहे. राजगड किल्ला केवळ ऐतिहासिक वारसा नाही, तर तो एक साहस, एक प्रवास आणि मराठ्यांच्या अदम्य शौर्याला वाहिलेली आदरांजली आहे. येथील प्रत्येक दगड भूतकाळाच्या कथा सांगतो. इतिहासप्रेमींना येथे मराठ्यांच्या विजयगाथांचा अनुभव येतो. ट्रेकिंगच्या चाहत्यांसाठी हा किल्ला एक रोमांचक आहे. निसर्गप्रेमींना येथे सह्याद्रीच्या भव्य सौंदर्याचे दर्शन होते. येथील शांतता आणि वारा मनाला ताजेतवाने करतो.

राजगड महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे आणि पराक्रमाचे साक्षीदार असलेला हा किल्ला आजही दिमाखात उभा आहे. येथे आल्यावर प्रत्येक क्षण संस्मरणीय वाटतो. एकदा का तुम्ही येथे पोहोचलात, तर हा प्रवास केवळ एक ट्रेक राहणार नाही, तर तो एक ऐतिहासिक अनुभव बनून हृदयात कोरला जाईल. राजगड तुमची वाट पाहतो आहे, चला निघा ‘‘गडांच्या राजाला’’ भेट द्यायला!

**– संजय डी.ओरके**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई**

# वर्चस्वासाठी धडपड

भारताला अस्थिर आणि कमकुवत करणे, हे अमेरिकेचे पुढचे लक्ष्य असू शकते. त्यासाठी पाकिस्तान आणि बांगला देश हे भारताचे शेजारी अमेरिकेने हाताशी धरले आहेत. या व्यूहरचनेला भारतातील कोणत्याही घटकाकडून बळ मिळणार नाही, हे पाहणे अत्यावश्यक आहे.
भारताबरोबर व्यापार सुरु ठेवण्यात अमेरिकेला खरेच रस आहे का? हा प्रश्न आहे! 'भारताने आयातशुल्क शून्यापर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव दिला; पण आता खूप उशीर झाला आहे', असे विधान ट्रम्प यांनी केले आहे. अमेरिकेतून येणार्या कापसावरील कर भारताने हटविला. अमेरिकेकडून निर्यात होणार्या सर्व वस्तूंसंदर्भात आयात शुल्क शून्यावर आणण्याच्या प्रस्तावाबद्दल भारताकडून अधिकृत भाष्य झालेले नाही. कापसावरील आयात शुल्क हटविण्याचा फटका येथील कापूस उत्पादकांना बसण्याची भीती आहे; पण मूळ मुद्दा आहे तो अमेरिकेच्या मनाप्रमाणे भारताकडून धोरणात बदल होत नाही हा! याचीच खदखद गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेकडून व्यक्त होत आहे. भारत रशियाकडून अधिक प्रमाणात शस्त्रास्त्रांची खरेदी करतो, बहुतांशी तेलही रशियाकडून घेतो, असा संताप ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे. चीनमधील घडामोडींनंतर ट्रम्प यांच्या पाठीराख्यांकडून दोन प्रकारच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. एक आहे भारताला चुचकारण्याची, दुसरी भारताला दूषणे देणारी. परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी समाजमाध्यमांवर पोस्ट टाकून 'भारत – अमेरिका संबंध नव्या उंचीवर पोहोचले आहेत', असे म्हटले आहे. ट्रम्प यांनी जशी आदळआपट केली तशी त्यांचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांच्याकडूनही ती झाली. 'आयात शुल्काच्या वेडाचारामागील गृहस्थ' या शब्दांमध्ये जगभर पीटर नवारो यांची संभावना होत आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशाचे पंतप्रधान पुतिन आणि झी जिनपिंग यांच्याशी मैत्रीचे संबंध का ठेवत आहेत? असा आगाऊपणाचा सवाल नवारो यांनी केला. लाखो चिनी विद्यार्थ्यांसाठी पायघड्या घालणार्या ट्रम्प यांना त्यांनी तो प्रश्न विचारला पाहिजे. वाढीव आयात शुल्कातून चीनला वगळण्याचा अर्थही या दोघांनी जगाला समजावून द्यावा. 'आम्ही अमेरिका आणि पाश्चात्यांच्या हातातील कळसूत्री बाहुली बनून दहशतवाद पोसला', असे पाकिस्तानच्या उपपंतप्रधानांनी 'ऑपरेशन सिंदूर'नंतर जाहीरपणे मुलाखतीत सांगितले होते.

**दुटप्पीपणाचे टोक**

दहशतवाद्यांची फौज भारताविरूद्ध वापरताना आपण लोकशाही देशाचे नुकसान करत आहोत, हे ज्ञान वर्षानुवर्षे अमेरिकेला नव्हते का? डॉलरला आव्हान देणार्या सद्दाम हुसेन यांना रासायनिक शस्त्रांच्या निर्मितीचा आरोप करत ठार केले, तेव्हा अमेरिकेला स्वतःच्या कथित लोकशाहीची आठवण झाली नव्हती. मन मानेल तसे कोणत्याही देशावर आयात शुल्क लादणारे ट्रम्प कोणत्या हुकूमशहापेक्षा कमी मान्यता येतील? अमेरिकेने दहशतवाद्यांचा जागतिक कारखाना असलेल्या पाकिस्तानला नाणेनिधीची मदत मिळण्यात हातभार लावला; पण 'यूएसएड'मार्फत दक्षिण आशियाई देशांतील हजारो कुपोषित बालकांना व वृद्धांना अन्न आणि औषधोपचाराचा आधार मिळत होता ती मदत बंद केली. भारतीय अर्थव्यवस्था जर मृतावस्थेत आहे, तर भारत कोणती पावले उचलतो याच्याशी अमेरिकेचे देणेघेणे असण्याचे कारण नव्हते. ते आहे, याचाच अर्थ भारताच्या आव्हनाची अमेरिकेला चिंता वाटते. स्थानिक चलनाच्या स्वीकारार्हतेचे प्रमाण वाढल्यास तो डॉलरसाठी फटका असेल. अमेरिकेला ते नको आहे. स्वहित जपण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक देशाला आहे; पण इतरांनी ते करण्यास अमेरिकेची आडकाठी! रशियाबरोबर अमेरिकेचा व्यापार भारतापेक्षा अधिक आहे, हे अलीकडेच समोर आले. तरीही रशिया-युक्रेन युद्धाला 'मोदी' युद्ध म्हणणे ही अमेरिकेची आजची गरज ठरली. ज्या पद्धतीने ट्रम्प आणि त्यांची फळी भारताविरूद्ध गरळ ओकत आहे आणि त्यांच्या अपप्रचाराला भारत फार उत्तर देत नाही, यातून अमेरिकेचेच हसे होत आहे. नोबेलसाठी ट्रम्प यांनी आशाळभूत होत संघर्ष थांबविल्याचे चर्हाट लावणे एकवेळ समजून घेता येईल; मात्र पहलगाम हल्ल्याचा कर्ताकरविता असलेल्या असीम मुनीर यांना 'व्हाइट हाऊस'मध्ये बोलावणे, 'अर्धे जग अणुयुद्धात खाक होईल', यासारखी धमकीची भाषा अमेरिकेच्या भूमीवरून करण्यास मुनीरना मुभा देणे, हे भारतीयांकडून कदापी विसरले जाऊ शकत नाही. ती चूक जागतिक समीकरणांच्या फेरमांडणीची सुरुवात होती, याची ट्रम्प यांना निश्चित जाणीव होईल.



# उकडीचे मोदक

सुग्रास सुगरण : गायत्री डोंगरे

गणेशोत्सवात पारंपरिक उकडीचे मोदक तर आपण सगळेच करतो, पण जरा हटके वाटेल असे सुंदर जास्वंदाच्या फुलाच्या आकाराचे मोदक खूप आकर्षक दिसतात आणि चवीलाही अप्रतिम लागतात.

साहित्य : सारणासाठी किसलेला नारळ : २ वाट्या गूळ : १ १/२ वाटी वेलचीपूड : १/२ टीस्पून थोडे तूप उकडीसाठी तांदळाचे पीठ : २ वाट्या बीटरूट पाणी : २ वाट्या मीठ : चिमूटभर तूप : १ टीस्पून

कृती : १. सारण तयार करणे : कढईत थोडं तूप गरम करून त्यात नारळ आणि गूळ घाला. गूळ छान विरघळला की हलवून मिश्रण थोडं घट्ट होऊ द्या. शेवटी वेलचीपूड घालून सारण थंड करायला ठेवा. २. उकड तयार करणे : बीटरूट किसून त्यात पाणी घालून अर्धा तास ठेवायचे. या पाण्यात मीठ व तूप घालून उकळी आणा. त्यात तांदळाचे पीठ टाकून



ढवळा आणि झाकण ठेवून ५ मिनिटे वाफवून घ्या. गॅस बंद करून मिश्रण कोमट झाल्यावर मळून गुळगुळीत उकड तयार करा. ३. जास्वंद आकाराचे मोदक घडवणे :



उकडीचा एक गोळा घ्या, त्याची पातळ पारी (मोदकाची कवच) लाटून घ्या. त्यात सारण टाकून ५ मोठ्या कळ्या पडाव्या. या कळ्या पूर्ण बंद करून झाल्यावर आता एका एका कळीला कडेकडेने हलकेच जास्वंदाच्या पाकळ्यांसारखे फोल्ड द्या. पाकळ्यांच्या टोकाला बारीक करून मध्यभागी एकत्र आणा म्हणजे अगदी जास्वंदासारखा आकार दिसेल. ४. वाफवणे : तयार मोदकांना वाफेवर १०-१२ मिनिटे शिजवून घ्या. वाफवल्यावर त्यावर तुप सोडावे. असे जास्वंद आकाराचे मोदक बाप्पालाही नक्की आवडतील.

# गाढ आणि शांत झोपेसाठी या ५ टिप्स नक्की फॉलो करा!

मुंबई : आजकालच्या धावपळीच्या जीवनात, ताण-तणाव आणि इतर अनेक कारणांमुळे बर्‍याच लोकांना रात्री शांत झोप लागत नाही. पुरेशी झोप न मिळाल्यामुळे त्याचा थेट परिणाम आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होतो. जर तुम्ही देखील अशाच समस्येमुळे त्रस्त असाल तर आम्ही तुम्हाला काही सोप्या आणि प्रभावी टिप्स सांगणार आहोत, ज्या तुम्हाला गाढ झोप मिळवण्यासाठी मदत करतील.

१. झोपण्याची वेळ निश्चित करा: सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, तुम्ही दररोज एकाच वेळी झोपण्याची आणि उठण्याची सवय लावा. तुमच्या शरीराची एक मस्लीप क्लॉकफ (झोपेची वेळ) तयार होईल, ज्यामुळे तुम्हाला वेळेवर झोप लागण्यास मदत होईल. सुट्टीच्या दिवशीही ही वेळ पाळण्याचा प्रयत्न करा.२. मोबाईल आणि गॅजेट्सपासून दूर राहा: झोपण्यापूर्वी किमान एक तास आधी मोबाईल फोन, टॅबलेट आणि लॅपटॉप यांसारख्या इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सचा वापर टाळा. या गॅजेट्समधून येणारा निळा प्रकाश (इर्श्रीश ङळसहीं) आपल्या मेंदूला सक्रिय ठेवतो, ज्यामुळे झोपेची प्रक्रिया थांबते.

३. झोपण्यापूर्वी हलका आहार घ्या: रात्रीचे जेवण झोपण्यापूर्वी किमान २-३ तास आधी घ्या. रात्रीच्या वेळी जड, मसालेदार किंवा तळलेले पदार्थ खाणे टाळा. जेवणानंतर लगेच झोपल्यास पचनक्रियेवर ताण येतो आणि झोपमोड होऊ शकते.

४. खोलीतील वातावरण शांत ठेवा: तुमची झोपण्याची खोली शांत, अंधारी आणि थंड ठेवण्याचा प्रयत्न करा. आवाज, जास्त उष्णता किंवा जास्त प्रकाश यामुळे झोपमोड होऊ शकते. आवश्यक असल्यास, जाड पडदे किंवा इअरप्लगचा वापर करू शकता.

५. हलका व्यायाम आणि ध्यान (चशवळींरींळेप): दिवसभरात नियमितपणे हलका व्यायाम करा. मात्र, झोपण्याच्या वेळ्यात तीव्र व्यायाम करणे टाळा, कारण त्यामुळे शरीर जास्त सक्रिय होते. झोपण्यापूर्वी काही वेळ ध्यान करणे किंवा शांत संगीत ऐकणे यामुळे मनाला शांती मिळते आणि चांगली झोप लागण्यास मदत होते.

या सोप्या टिप्स फॉलो केल्यास तुम्हाला शांत आणि गाढ झोप मिळण्यास नक्कीच मदत होईल. कारण, पुरेशी झोप हे निरोगी आणि आनंदी जीवनाचे एक महत्त्वाचे रहस्य आहे.



# प्रोटीनचा उत्तम स्रोत! 'या' ड्रायफ्रूट्समुळे मिळेल भरपूर प्रोटीन

मुंबई: आजच्या धावपळीच्या जीवनात शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी प्रोटीन अत्यंत महत्त्वाचं आहे. प्रोटीन शरीरातील पेशींच्या निर्मितीसाठी, स्नायूंच्या वाढीसाठी आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी मदत करते. अनेक लोकांना वाटतं की फक्त मांसाहारी पदार्थांमधूनच प्रोटीन मिळतं, पण हे खरं नाही. काही निवडक ड्रायफ्रूट्समध्येही भरपूर प्रोटीन असतं.

१. बदाम (-श्रोपवी)
बदाम केवळ मेंदूसाठीच नाही, तर प्रोटीनचाही एक उत्तम स्रोत आहे. १०० ग्रॅम बदामामध्ये जवळपास २१ ग्रॅम प्रोटीन असतं. बदाम खाल्ल्याने स्नायू मजबूत होतात आणि शरीराला ऊर्जा मिळते.

२. अक्रोड (थरश्रपींीि)
अक्रोडला 'ब्रेन फूड' म्हणून ओळखलं जातं.

## शिंकताना किंवा खोकताना लघवी होत असेल तर असू शकतो हा आजार... डॉक्टर टीप्स



### हेल्थ टिप्स

परिस्थितीत शिंक किंवा खोकला आल्यावर लघवी होऊन जाते.
कारणे-
स्नायूंचा कमकुवतपणा
महिलांमध्ये सरत्या वयानुसार हा आजार होऊ शकतो. साधारणपणे वयाच्या ३० ते ३५ वर्षानंतर हा त्रास उद्भवतो.
काही महिलांमध्ये वृद्धत्वानुसार हा आजार संभवतो.
बाळास जन्म दिल्यावर अनेक स्त्रियांच्या खालील शरीराच्या स्नायू कमकुवत होतात. कारण बाळाच्या जन्माच्या वेळीस हे स्नायू जास्त ताणले जातात.
जेव्हा आई कमजोर आणि मूळ सशक्त असल्यास असे होणे अधिक संभवते.
या शिवाय स्थूलपणा, मधुमेह असल्यास हा त्रास संभवतो.
(क्रमशः)




## विनोद

**मुलगा : आई, नव्या ट्युबमधील टूथपेस्ट किती लांब होते माहीत आहे.**
**आई : नाही, तू सांग.**
**मुलगा : गॅलरीत पिळायला सुरुवात केली तर बाथरूमपर्यंत येते. एवढीच लांब आहे.**

## संदेश

Santa: tumhaari wife kyu hamesha gussa rahti hai?
Banta: maine galti se use bola tha ki "tum gusse main bhi bahut khoob lagti ho"

## सुविचार

गुलाब देणाऱ्या हातांना त्याचा सुगंध चिकटल्याशिवाय राहात नाही.

**– बाबा आमटे**




**संस्कृत सुभाषित**

**अनिर्वेदः श्रियो मूलं लाभस्य च शुभस्य च।। (उद्योगपर्व, अध्याय ३९, ोक ५९, महाभारत)**

**अर्थ –** लक्ष्मीचे, लाभाचे आणि कल्याणाचे मूळ सतत उद्योग करणे हे आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र.२९



## आडवे शब्द

१. गणपतीच्या रूपाचे आरतीमधील वर्णन
७. छोटी लढाई
१०. समूह, जथा
११. नड
१२. त्रासदायक
१४. चिखलाची जमीन
१६. डोळ्यात पाणी आणणारा कंद
१७. बेचव
१९. हिंदीत वागण्यचे वळण
२०. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
२१. पोरका
२२. बाळभाषेत ईश्वर
२३. आईवडिलांचे छत्र असलेला
२४. कमळ
२५. युवक
२७. किंमत
२८. हुक्की, लहर
२९. कहाणी
३०. दुर्दशा
३२. उत्कर्षाचा काळ
३५. सांघिक व्यायाम
३७. मान देण्यास योग्य असा
३९. सापाची एक जात
४०. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
४२. आठवण
४३. रामाला बोरे देणारी
४४. सारखा
४६. आई
४८. रामचरित मानस लिहिणारे हिंदी संत
५०. साग्रसंगीत भोजनाची खाशी पंगत
५३. किंमत
५५. मूल
५७. उणीव भरून काढणारी
५८. छोटासा
६१. पिकाचा पावसाळी हंगाम
६२. सुगंध
६३. रियाझ
६४. हाताचा उपडा पंजा
६५. सरोवर
६६. ठाणवई
६७. प्रजा
६८. 'माई' जोडल्यास विठ्ठलपत्नीचे नाव
७०. कोणत्याही क्षेत्रातील प्रतिभावंत
७२. मांडणी करणे, एकावर एक ठेवणे
७४. वर्दळ
७५. पांढरशुभ्र (हिंदी)
७८. खांद्यावरून घ्यायचे वस्त्र
७९. कठीण प्रसंग
८०. होडके, नावाडी

## उभे शब्द

२. डोंगर खोदून केलेला रस्ता
३. प्रत्येक
४. चंद्र
५. किंचित तांबड्या रंगाचे
६. गोष्ट फुगवून सांगणे (वाक्प्रचार)
७. स्वच्छ, चमकणारे
८. मोगऱ्याची मोठ्या पाकळ्यांची जात
९. झोक, वळण
१०. एकमेकांवर काम ढकलणे, चुकवाचुकव
१३. अस्थिर संपत्ती
१५. पाकळी, तुकडी
१६. बायको
१८. पौराणिक अश्ववाहन
२१. अगम्य
२३. उत्सव
२४. कारण
२६. तात्पुरते रुसणे
२७. भारताचा राष्ट्रीय पक्षी
२८. मानसिक धक्का (हिंदी)
३०. पाडाव, पडणे
३१. खराब, वाईट
३३. घोडा
३४. मुद्यावरून गुद्यावर येणे
३६. संगीतातील एक राग
३८. अनावश्यक
४१. अत्तरासाठी प्रसिद्ध उत्तर प्रदेशातील शहर
४४. नेहमी
४५. नमुनेदार
४६. सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा
४७. अपघात, दुर्दैवी प्रसंग (हिंदी)
४९. लवकुशाची आई
५०. पुराणकालीन पर्वत, दंड लावल्यास पाठीचा कणा
५१. चंचल, बेशिस्त
५२. शांतता
५४. प्रमाणपत्र, उदाहरण
५६. सत्व
५९. चर, खंदक
६०. नवारीने बाज विणणे
६२. फुल, पुष्प
६३. एकरूपता
६५. बोबडी वळणे
६९. उंचीने कमी
७१. तमाशातील ठसकेबाज नृत्यगीत
७३. ओरखडा
७४अ. कर्ता विचारणारा प्रश्न
७६. रिंगण
७७. औषध

## आडवे उत्तर

१.लंबोदर पितांबर ७.चकमक १०.टोळी ११.गरज १२.जाचक १४.दलदल १६.कांदा १७.नीरस १९.चालचलन २०.लवाद २१.अनाथ २२.बाप्पा २३.सनाथ २४.सरोज २५.तरूण २७.मोल २८.सणक २९.कथा ३०.परवड ३२.लहरबहर ३५.कवायत ३७.माननीय ३९.मणेर ४०.मनकवडा ४२.सय ४३.शबरी ४४.समान ४६.माता ४८.तुल-सीदास ५०.मेजवानी ५३.दरदाम ५५.लेकरू ५७.भर ५८.लहानसा ६१.खरीप ६२.सुवास ६३.सराव ६४.तळवा ६५.तलाव ६६.समई ६७.रयत ६८.रखु ७०.कलाकार ७२.रचणे ७४.ये-जा ७५.सफेद ७८.उपरणे ७९.आणीबाणी ८०.तारवा

## उभे उत्तर

२.बोगदा ३.दर ४.रजनीनाथ ५.तांबूस ६.रजाचा गज करणे ७.चकचकीत ८.मदनबाण ९.कल १०.टोलवाटोलव १३.चल १५.दल १६.कांता १८.रथ २१.अनाकलनीय २३.सण २४.सबब २६.रुसवा २७.मोर २८.सदमा ३०.पतन ३१.डबडा ३३.हय ३४.हमरीतुमरीवर येणे ३६.यमन ३८.नसता ४१.कन्नोज ४४.सदा ४५.मासलेवाईक ४६.मामलतदार ४७.हादसा ४९.सीता ५०.मेरू ५१.वाभरा ५२.नीरवता ५४.दाखला ५६.कस ५९.हाळ ६०.नवारणे ६२.सुम ६३.समरसता ६५.ततपप ६९.खुजा ७१.लावणी ७३.चरा ७४अ.कोणी ७६.फेर ७७.दवा



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### ''मनाची तयारीच होत नाहीये'', विराटचे बंगळुरूमधील चेंगराचेंगरी प्रकरणाबाबत....'

मुंबई-रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने १८ वर्षांच्या मोठ्या प्रतिक्षेनंतर आयपीएल २०२५ मध्ये स्पर्धेचे जेतेपद पटकावले. आयपीएलच्या १८व्या हंगामात आरसीबीने अंतिम फेरीत पंजाब किंग्सचा पराभव केला आणि जेतेपदावर नाव कोरलं. या विजयानंतर आरसीबीचे सर्व खेळाडू आणि चाहतावर्ग जेतेपदाच्या विजयाचा जल्लोष साजरा करत होता. पण यानंतर ४ जुलैच्या विक्ट्री परेडदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये चाहत्यांनी आपला जीव गमावला आणि या आनंदाचं दु:खात रूपांतर झाले. विराट कोहलीने पहिल्यांदाच या प्रकरणावर वक्तव्य करत हळहळ व्यक्त केली आहे. आरसीबी फ्रँचायझीने आपल्या चाहत्यांबरोबर विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी ४ जून रोजी बेंगळुरूमध्ये विजयी परेड आयोजित केली होती, परंतु या परेडमधील चेंगराचेंगरीमुळे हा आनंद दु:खात बदलला. मोठ्या संख्येने चाहते पोहोचल्यामुळे चेंगराचेंगरी झाली, ज्यामध्ये ११ जणांना आपला जीव गमवावा लागला. आता या संपूर्ण प्रकरणात आरसीबी संघाचा स्टार खेळाडू विराट कोहलीचं वक्तव्य समोर आलं आहे.

आरसीबी संघाने विराट कोहलीचं वक्तव्य एका पोस्टद्वारे शेअर केलं आहे. आरसीबी फ्रँचायझीने तीन महिन्यांनंतर पहिल्यांदा सोशल मीडिया पेजवर २८ ऑगस्टला पोस्ट शेअर केली आणि चाहत्यांसाठी एक पत्र लिहिलं. यानंतर संघाने मृत्यू पावलेल्या चाहत्यांना आरसीबी केअर्सच्या माध्यमातून २५ लाखांची मदत जाहीर केली. यानंतर आता ३ सप्टेंबर रोजी संघाचा सर्वात महत्त्वाचा खेळाडू विराट कोहलीचं चेंगराचेंगरी प्रकरणाबाबत वक्तव्य पोस्ट करत आरसीबीने शेअर केलं आहे.

विराट कोहली ४ जुलैला झालेल्या प्रकरणाबाबत म्हणाला, ''४ जूनच्या व्यथित करणाऱ्या घटनेतून आपण कसं सावरावं? यासाठी मनाची तयारीच होत नाही. आपल्या फ्रँचायझीच्या इतिहासातील हा सर्वात आनंदाचा क्षण असायला हवा होता, पण तो एखाद्या दु:खद घटनेत रूपांतरित झाला. ज्या चाहत्यांनी या घटनेमध्ये आपले प्राण गमावले आणि ज्यांना दुखापत झाली, मी त्यांच्या कुटुंबासाठी प्रार्थना करत आहे. तुम्ही जे गमावलं त्याची भरपाई कशानेही होऊ शकत नाही, पण तुम्ही आमच्या प्रवासाचा अविभाज्य भाग आहात. आपण सगळे मिळून जबाबदारीने पुढे जाऊ.''रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू फ्रँचायझीने आरसीबी केअर्सच्या माध्यमातून बंगळुरूतील विक्ट्री परेडदरम्यान चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना २५ लाख रुपये देण्याची घोषणा केली आहे. या घटनेत सुमारे ३३ जण जखमीही झाले आहेत.

या प्रकरणाची न्यायालयीन चौकशीचे आदेशही देण्यात आले होते, त्यानंतर आजपर्यंत बेंगळुरूतील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर कोणताही आंतरराष्ट्रीय सामना खेळवण्यात आलेला नाही.

तर चिन्नास्वामी स्टेडियममध्ये महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ चे सामने आता नवी मुंबईतील डॉ. डीवाय पाटील स्पोर्ट्स अकादमीमध्ये आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

***

### सूर्यकुमार यादवने अचानक बदलला प्लॅन, 'या' दिवशी दुबईला जाणार भारतीय कर्णधार

दिल्ली-आशिया कप २०२५ ला ९ सप्टेंबर पासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेसाठी काही दिवसांपूर्वीच टीम इंडियाची घोषणा झाली होती यात संघाचे नेतृत्व हे सूर्यकुमार यादवकडे देण्यात आले तर उपकर्णधार म्हणून शुभमन गिलची नेमणूक करण्यात आली. पूर्वी आंतरराष्ट्रीय दौऱ्यासाठी संघातील खेळाडू हे मुंबईत जमायचे, पण आता खेळाडू तुकड्या तुकड्यांनी दुबईला रवाना होणार आहेत. अशातच भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव हा सुद्धा लवकरच दुबईला रवाना होणार असल्याची बातमी समोर आलीये.

टीम इंडिया दुबईला कधी जाणार?

आशिया कप २०२५ ही स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान खेळवली जाईल. या स्पर्धेत यंदा ८ संघ सहभागी होणार असून यांना ए आणि बी या दोन संघात विभागण्यात आलंय, १५ खेळाडूंचा भारतीय संघ स्पोर्ट स्टाफ सोबत ४ सप्टेंबरच्या संध्याकाळी दुबईला रवाना होईल. मात्र सूर्यकुमार यादव हा बुधवार ३ सप्टेंबर रोजी संध्याकाळी दुबईला रवाना होणार आहे. खेळाडूंच्या प्रवासाच्या वेळेचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि त्यांना ताणतणावापासून वाचवण्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने नेहमीची गट प्रवास योजना सोडून देण्याचा निर्णय घेतला आहे.

देशांतर्गत क्रिकेटमुळे बदलला प्लॅन :

सध्या दुलीप ट्रॉफी स्पर्धा खेळवण्यात येत आहेत. त्यामुळे प्रत्येक खेळाडू त्यांच्या शहरातून दुबईसाठी रवाना होईल. घसर्वजण संध्याकाळी ५ वाजण्यापूर्वी दुबईमध्ये जमतील. याचा अर्थ शुभमन गिल, हार्दिक पंड्या आणि जसप्रीत बुमराह सारखे स्टार खेळाडू थोड्या वेगळ्या वेळी संघात सामील होतील. अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, शिवम दुबे, अक्षर पटेल हे देखील त्यांच्या घरातून थेट दुबईला जातील.

## किरॉन पोलार्डच्या धडाकेबाज खेळीने गयाना मैदान हादरले

गयाना : किरॉन पोलार्ड याने कॅरिबियन प्रीमियर लीगमध्ये धडाकेबाज खेळी साकारत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या सामन्यात त्याने चौफेर फटकेबाजी करत केवळ २९ चेंडूत २२४.१४ च्या स्ट्राईक रेटने झंझावाती ६५ धावा ठोकल्या. त्याच्या या खेळीत ८ षटकार आणि २ चौकारांचा समावेश होता.त्रिनबागो नाईट रायडर्सने प्रथम फलंदाजी करत १७९ धावांचे भक्कम लक्ष्य उभारले. प्रत्युत्तरात सेंट किट्स अँड नेव्हिस पॅट्रियट्स केवळ १६७ धावांवर गारद झाले. त्यामुळे त्रिनबागो नाईट रायडर्सने हा सामना १२ धावांनी जिंकत रोमांचक विजय मिळवला.

किरॉन पोलार्डने आधी सुरुवातीला सावधगिरीने फलंदाजी केली. त्रिनबागो नाईट रायडर्सचा हा तडाखेबाज खेळाडू पहिल्या १३ चेंडूत केवळ १२ धावा करून स्थिरावला. मात्र एकदा नजर सरावल्यानंतर त्याने गोलंदाजांचा समाचार घेतला. १५व्या षटकात नवीन बिदेसी गोलंदाजीला आला. या षटकातील तिसर्या आणि चौथ्या चेंडूवर पोलार्डने सलग दोन षटकार ठोकले. पाचवा चेंडू चुकवला, पण लगेचच सहाव्या चेंडूवर गगनचुंबी षटकार खेचला.

यानंतर १६वे षटक टाकण्यासाठी अफगाणिस्तानचा गोलंदाज वकार



सलामखिल आला. या षटकाच्या तिसर्या चेंडूवर पोलार्डला स्ट्राईक मिळाली. त्याने त्यानंतर वकारच्या तिसर्या, चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या चेंडूवर सलग चार षटकार ठोकले. अशा प्रकारे पोलार्डने खेळलेल्या ८ चेंडूत तब्बल ७ षटकारांची आतषबाजी केली. त्याने अवघ्या २१ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले होते. त्रिनबागो नाईट रायडर्सच्या सलामीवीरांपैकी कॉलिन मुनरो (१७) आणि ॲलेक्स हेल्स (७) मोठी धावसंख्या उभारू शकले नाहीत. त्यानंतर डॅरेन ब्रावोही २१ धावांवर बाद झाला. मात्र, किरॉन पोलार्डच्या साथीला निकोलस पूरन उभा राहिला. त्याने जबाबदारी स्वीकारत ३८ चेंडूत ३ षटकार आणि ४ चौकारांच्या मदतीने ५२ धावांची खेळी केली.

पोलार्डच्या झंझावाती फटकेबाजीच्या जोरावर प्रथम फलंदाजी करत सेंट किट्स अँड नेव्हिस पॅट्रियट्ससमोर १८० धावांचे आव्हान ठेवले. लक्ष्याचा पाठलाग करताना सेंट किट्स अँड नेव्हिस पॅट्रियट्सची सुरुवात दणदणीत झाली. सलामीवीरांनी पहिल्या विकेटसाठी तब्बल ९६ धावांची भागीदारी रचली. इविन लुईसने २५ चेंडूत ४ षटकारांसह ४२ धावा ठोकल्या, तर आंद्रे फ्लेचरने ५४ चेंडूत ६७ धावांची खेळी साकारली. मात्र, ही जोडी माघारी परतल्यानंतर संघाचा डाव कोसळला आणि ते विजयापासून अवघ्या १३ धावांनी दूर राहिले. त्रिनबागोच्या गोलंदाजांपैकी मोहम्मद आमिरने २ तर नॅथन एडवर्ड्सने ३ बळी टिपले. झंझावाती फलंदाजीबद्दल किरॉन पोलार्डला प्लेअर ऑफ द मॅच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## आर. प्रज्ञानंद फिडे क्लासिकल बुद्धिबळ क्रमवारीत चौथ्या स्थानी

मुंबई : सिंकफिल्ड बुद्धिबळ करंडकात दुसरे स्थान मिळवलेल्या भारताच्या आर. प्रज्ञानंद याने फिडे क्लासिकल बुद्धिबळ क्रमवारीत चौथ्या स्थानी झेप घेतली आहे. आर. प्रज्ञानंद याला २७८५ एलो रेटिंगची कमाई करता आलेली आहे. नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन हा २८३९ रेटिंगसह पहिल्या स्थानावर कायम आहे. मॅग्नस कार्लसन हा विश्व अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सहभागी होत नाही. तसेच डी. गुकेश हा वर्तमान विश्वविजेता आहे. तरीही मॅग्नस कार्लसन हा क्लासिकल प्रकारात रेटिंगच्या जोरावर पहिल्या स्थानावर विराजमान आहे. त्यानंतर दोन स्थानांवर अमेरिकन खेळाडूंचे वर्चस्व प्रकर्षाने दिसून येत आहे. हिकारु नाकामुरा हा २८०७ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर असून, फॅबियानो कारुआना २७८९ रेटिंगसह तिसऱ्या स्थानावर आहे. भारताच्या तीन पुरुष खेळाडूंचा फिडे क्लासिकल अव्वल १० क्रमवारीत समावेश आहे. आर. प्रज्ञानंद चौथ्या स्थानावर आहे. तसेच अर्जुन एरीगेसी २७७१ रेटिंगसह पाचव्या स्थानावर आहे. शिवाय डी. गुकेश २७६७ रेटिंगसह सहाव्या स्थानावर आहे. महिलांच्या अव्वल २० खेळाडूंच्या क्रमवारीत कोनेरू हंपी, दिव्या देशमुख व द्रोणावल्ली हरिका या भारतीय खेळाडूंचा समावेश आहे. कोनेरू हंपी पाचव्या स्थानावर आहे. विश्वविजेती दिव्या देशमुख १४व्या स्थानावर आहे. तसेच द्रोणावल्ली हरिका १९व्या स्थानावर आहे. पुरुष विभागातील सर्वोत्तम सहा खेळाडू

१) मॅग्नस कार्लसन (नॉर्वे) - २८३९ रेटिंग २) हिकारू नाकामुरा (अमेरिका) - २८०७ रेटिंग ३) फॅबियानो कारुआना (अमेरिका) - २७८९ रेटिंग ४) आर. प्रज्ञानंद (भारत) - २७८५ रेटिंग ५) अर्जुन एरीगेसी (भारत) - २७७१ रेटिंग ६) डी. गुकेश (भारत) - २७६७ रेटिंग

महिला विभागातील सर्वोत्तम सहा खेळाडू

१) होऊ यिफान (चीन) - २६०९ रेटिंग २) जू वेनजुन (चीन) - २५७० रेटिंग ३) लेई टिंगजी (चीन) - २५६५ रेटिंग ४) झू जिनर (चीन) - २५४८ रेटिंग ५) कोनेरू हंपी (भारत) - २५३५ रेटिंग ६) मुझीचूकना (युक्रेन) - २५३५ रेटिंग

## मिस्टर ३६०फएबी डिव्हिलियर्सचे आरसीबीमध्ये पुनरागमनाचे संकेत, पण नव्या भूमिकेत!




बंगळुरू: रॉयल चॅलेंजर्स बंगळूर (ठउइ) संघाचा लाडका खेळाडू, 'मिस्टर ३६०' एबी डिव्हिलियर्सने पुन्हा एकदा आयपीएलमध्ये परतण्याचे संकेत दिले आहेत. मात्र, यावेळी तो खेळाडू म्हणून नाही, तर नव्या भूमिकेत संघात सामील होऊ शकतो. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याने आयपीएलमध्ये, विशेषतः आरसीबीसोबत पुन्हा जोडले जाण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

डिव्हिलियर्सने स्पष्ट केले आहे की, पूर्ण हंगामासाठी खेळाडू म्हणून खेळणे त्याच्यासाठी आता शक्य नाही, परंतु जर आरसीबीला प्रशिक्षक किंवा मार्गदर्शक (चशपींी) म्हणून त्याची गरज भासली तर तो नक्कीच परत येईल. माझं मन नेहमी आरसीबीसोबत राहील, असे त्याने सांगितले. एबी डिव्हिलियर्सने २०२१ मध्ये क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. त्याने आरसीबीसाठी १५७ सामने खेळले, ज्यात ४५२२ धावा केल्या. त्याचा स्ट्राइक रेट १५८.३३ होता. आरसीबीच्या चाहत्यांसाठी तो केवळ एक खेळाडू नसून एक भावना आहे आणि त्याच्या पुनरागमनाची बातमी त्यांच्यासाठी आनंदाची आहे. २०१६ चा आयपीएल हंगाम त्याच्यासाठी सर्वात यशस्वी ठरला होता, ज्यात त्याने १६ सामन्यांत ६८७ धावा केल्या होत्या.

## भारत विरुद्ध श्रीलंका सामन्याने महिला विश्वचषकाला होणार सुरुवात

मुंबई : महिला विश्वचषकाची सुरुवात ३० सप्टेंबरपासून होत आहे. या स्पर्धे साठी आयसीसीने ऐतिहासिक निर्णय घेत बक्षिसाच्या रकमेत तब्बल २९७ टक्क्यांनी वाढवली आहे. आयसीसीचे प्रमुख जय शाह यांनी महिला वर्ल्ड कपसाठी १३.८८ मिलियन डॉलर्स (सुमारे १२२ कोटी रुपये) इनामी रक्कम जाहीर केली आहे. आयसीसी प्रमुख पद सांभाळताच जय शाह यांनी महिला क्रिकेटला नवा उंचीवर देण्यासाठी हा मोठा टप्पा पार केला आहे.

महिला वर्ल्ड कपची प्राईज मनी

विजेता संघ - ४.४८ मिलियन डॉलर्स (सुमारे ४० कोटी रुपये)

उपविजेता संघ - २.२४ मिलियन डॉलर्स (सुमारे २० कोटी रुपये)

सेमीफायनलमध्ये पोहोचलेले संघ - प्रत्येकी सुमारे १० कोटी रुपये

पाचवा व सहावा क्रमांक - प्रत्येकी ६ कोटी रुपये

सातवा व आठवा क्रमांक - प्रत्येकी २.५ कोटी रुपये

प्रत्येक संघाला किमान हमी रक्कम - २ कोटी ५० लाख रुपये

यंदाच्या स्पर्धेत भाग घेणार्या प्रत्येक




संघावर अक्षरशः पैशांचा पाऊस पडणार असून महिला क्रिकेटच्या इतिहासातील हा सर्वात मोठा आर्थिक टप्पा मानला जात आहे.

**संपूर्ण वेळापत्रक** –मंगळवार, ३० सप्टेंबर : भारत विरुद्ध श्रीलंका - बंगळुरू, बुधवार, १ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध न्यूझीलंड - इंदूर गुरुवार, २ ऑक्टोबर : बांगलादेश विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो शुक्रवार, ३ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका - बंगळुरू शनिवार, ४ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध श्रीलंका - कोलंबो रविवार, ५ ऑक्टोबर : भारत विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो सोमवार, ६ ऑक्टोबर : न्यूझीलंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका - इंदूर मंगळवार, ७ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध बांगलादेश - गुवाहाटी बुधवार, ८ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो गुरुवार, ९ ऑक्टोबर : भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका - विशाखापट्टणम शुक्रवार, १० ऑक्टोबर : न्यूझीलंड विरुद्ध बांगलादेश - विशाखापट्टणम शनिवार, ११ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध श्रीलंका - गुवाहाटी रविवार, १२ ऑक्टोबर : भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया - विशाखापट्टणम सोमवार, १३ ऑक्टोबर : दक्षिण आफ्रिका विरुद्ध बांगलादेश - विशाखापट्टणम मंगळवार, १४ ऑक्टोबर : नवीन झीलंड विरुद्ध श्रीलंका - कोलंबो बुधवार, १५ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो गुरुवार, १६ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध बांगलादेश - विशाखापट्टणम शुक्रवार, १७ ऑक्टोबर : दक्षिण आफ्रिका विरुद्ध श्रीलंका - कोलंबो शनिवार, १८ ऑक्टोबर : न्यूझीलंड विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो रविवार, १९ ऑक्टोबर : भारत विरुद्ध इंग्लंड - इंदूरसोमवार, २० ऑक्टोबर : श्रीलंका विरुद्ध बांगलादेश - कोलंबो-

मंगळवार, २१ ऑक्टोबर : दक्षिण आफ्रिका विरुद्ध पाकिस्तान - कोलंबो बुधवार, २२ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध इंग्लंड - इंदूर, गुरुवार, २३ ऑक्टोबर : भारत विरुद्ध न्यूझीलंड - गुवाहाटी ,शुक्रवार, २४ ऑक्टोबर : पाकिस्तान विरुद्ध श्रीलंका - कोलंबो शनिवार, २५ ऑक्टोबर : ऑस्ट्रेलिया विरुद्ध श्रीलंका - इंदूर, रविवार, २६ ऑक्टोबर : इंग्लंड विरुद्ध न्यूझीलंड - गुवाहाटी रविवार, २६ ऑक्टोबर : भारत विरुद्ध बांगलादेश - बंगळुरू बुधवार, २९ ऑक्टोबर : उपांत्य सामना १ - गुवाहाटी/कोलंबो गुरुवार, ३० ऑक्टोबर : उपांत्य सामना २ - बंगळुरूरविवार, २ नोव्हेंबर : अंतिम सामना - कोलंबो/बंगळुरू

## हारिस रौफची फलंदाजीत विश्वविक्रमी कामगिरी!

दिल्ली-पाकिस्तानला टी-२० तिरंगी मालिकेतील अफगाणिस्तानविरूद्ध सामन्यात पराभव पत्करावा लागला आहे. पण या सामन्यात पाकिस्तानच्या गोलंदाजाने मात्र उत्कृष्ट फलंदाजी करत मोठा विक्रम आपल्या नावे केला. अफगाणिस्तानच्या भेदक गोलंदाजीसमोर जिथे पाकिस्तानचे फलंदाज टिकू शकले नाहीत. तिथे हारिस रौफने वादळी फटकेबाजी करत मोठी कामगिरी केली आहे.

हारिस रौफने अफगाणिस्तानविरूद्ध स्फोटक फलंदाजी करत इतिहास घडवला. १० व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या रौफने फक्त १६ चेंडूत ३४ धावांची नाबाद खेळी केली. यादरम्यान त्याने ४ गगनचुंबी षटकार लगावले आणि आपल्या धमाकेदार फलंदाजीने सर्वांना आश्चर्यचकित केलं.

हरिस रौफची ही खेळी पाकिस्तान क्रिकेट इतिहासात १० व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या कोणत्याही फलंदाजाची सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या ठरली. यापूर्वी हा विक्रम वेगवान गोलंदाज वहाब रियाझच्या नावावर होता, ज्याने १० व्या क्रमांकावर खेळताना २४ धावा केल्या होत्या. रौफने केवळ हा विक्रम मोडला नाही तर आपल्या आक्रमक खेळीने संघासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

रौफची नाबाद ३४ धावांची खेळी ही पूर्ण-सदस्य राष्ट्रांमधील टी-२० क्रिकेटमध्ये १० व्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या फलंदाजाने केलेली संयुक्तपणे



दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. या यादीत झिम्बाब्वेच्या फराज अक्रमचाही समावेश आहे, ज्याने १० व्या क्रमांकावर फलंदाजी करताना ३४ धावा केल्या होत्या.

हरिस रौफने त्याच्या धमाकेदार खेळीदरम्यान चार षटकार लगावले. तो आता टी-२० मध्ये १० व्या क्रमांकावर फलंदाजी करताना एका डावात सर्वाधिक षटकार लगावणारा १०वा फलंदाज बनला आहे. एकूण चार फलंदाजांनी हे यश मिळवले आहे, परंतु रौफ हा कसोटी खेळणाऱ्या देशाकडून हा पराक्रम करणारा दुसरा खेळाडू ठरला आहे. वेस्ट इंडिजचा अकील हुसेन हा पराक्रम करणारा पहिला खेळाडू ठरला होता. त्याने २०२२ मध्ये ब्रिजटाऊन, बार्बाडोस येथे इंग्लंडविरुद्ध ४ षटकार मारले होते.

रौफच्या या खेळीमुळे पाकिस्तानला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरली. अफगाणिस्तानच्या १६९ धावांच्या प्रत्युत्तरात, पाकिस्तानचा संघ २० षटकांत ९ गडी गमावून फक्त १५१ धावाच करू शकला.

अफगाणिस्तानकडून फजलहक फारुकी, कर्णधार रशीद खान, मोहम्मद नबी आणि नूर अहमद यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. या सामन्यात हरिस रौफने फलंदाजीत योगदान दिले असेल पण चेंडूने तो प्रभावी कामगिरी करू शकला नाही. रौफने ३ षटकं टाकली पण एकही विकेट घेऊ शकला नाही. यादरम्यान, त्याने १२.७० च्या इकॉनॉमी रेटने ३८ धावा दिल्या. पाकिस्तानकडून फहीम अश्रफने सर्वाधिक बळी घेतले. फहीमने ४ षटकांत २७ धावा देत ४ बळी घेतले.

## मुस्लिम असल्याने मलाच ट्रोल करतात :मोहम्मद शमी

मुंबई (प्रतिनिधी) : भारतीय संघातील अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने अगामी आशिया चषकासाठी निवड न झाल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे. या स्पर्धेसाठी बीसीसीआय निवड समितीने भारतीय संघात पाच गोलंदाजांना स्थान दिले असून त्यापैकी तीन वेगवान आहेत. ज्यांचे नेतृत्व जसप्रीत बुमराह करेल. मात्र, शमीला १५ सदस्यीय मुख्य संघात सोडून द्या, त्याला राखीव खेळाडूंच्या यादीतही समाविष्ट केलेले नाही. यावर्षी इंग्लंडविरुद्धच्या मायदेशातील टी-२० मालिकेद्वारे शमीने तीन वर्षांनंतर या फॉरमॅटमध्ये पुनरागमन केले होते. याआधी त्याने २०२२ च्या टी-२० विश्वचषकात त्याचा शेवटचा सामना खेळला होता. पुनरागमनाच्या पहिल्या सामन्यात (राजकोट) शमीला विकेट मिळाली नाही, मात्र वानखेडे येथे झालेल्या दुसऱ्या सामन्यात त्याने तीन बळी घेतले होते. पाकिस्तानविरुद्ध खेळणे इतर संघांविरुद्ध खेळण्यापेक्षा वेगळे आहे का? किंवा तो एक सामान्य सामना मानला जातो का? असे विचारले असता शमीने, 'तो अनुभव खरोखरच वेगळा आहे' असे सांगितले. शमीला




सोशल मीडियावरील ट्रोलिंगबद्दल विचारण्यात आले, तेव्हा ते म्हणाले, 'काही लोक मला मुस्लिम असल्यामुळे लक्ष्य करतात, विशेषतः पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यानंतर. पण मला त्याची पर्वा नाही, कारण मी काही यंत्र (मशीन) नाही. चांगले आणि वाईट दिवस येतच राहतील. जेव्हा मी माझ्या देशासाठी खेळतो, तेव्हा माझे लक्ष्य विकेट घेण्यावर आणि विजय मिळवण्यावर असते, सोशल मीडियावर नाही. ट्रोलिंगचा माझ्यावर कोणताही परिणाम होत नाही, कारण मी त्याकडे दुर्लक्ष करतो. ट्रोलिंगचा माझ्यावर कोणताही परिणाम होत नाही, कारण मी त्याकडे दुर्लक्ष करतो.' सरकार आणि मंडळाच्या निर्णयांचे पालन आशिया कप २०२५ मध्ये भारताला १४ सप्टेंबर रोजी पाकिस्तानविरुद्ध सामना खेळायचा आहे. त्याआधी एका वृत्तवाहिनीवर शमीला विचारण्यात आले की, भारताने पाकिस्तानविरुद्ध खेळायला हवे का? तेव्हा त्याने थेट उत्तर देणे टाळले आणि सांगितले की, 'मी वादांपासून दूर राहतो. सामन्यांबद्दलचे निर्णय सरकार आणि बीसीसीआय घेतात. आम्ही त्याचे पालन करतो.'

# ओंकार साखर कारखान्याने मोडली मोनोपली; देशात नंबर वन ग्रुप : आमदार संभाजीराव निलंगेकर

**निलंगा/आयुब बागवान:** या भागात ओंकार साखर कारखाना सुरू होण्यापूर्वी अनेक कारखानदार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सांगत असत 'तुझा ऊस आमच्या कारखान्याला द्यायचा असेल तर आमच्या सोबत राहा.' अशी मोनोपली येथे निर्माण झाली होती. पण ती मोडून काढण्याचे ऐतिहासिक काम ओंकार साखर कारखान्याने केले. आज या कारखान्याचे नाव राज्यातच नाही तर देशात झाले आहे,' असे प्रतिपादन माजी पालकमंत्री व आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

दिनांक ३ सप्टेंबर रोजी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना (लीज ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट २, अंबुलगा बु.) हंगाम २०२५-२६ चा मिल रोलर पूजन सोहळा आमदार निलंगेकर यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी व्यासपीठावर माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर, युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर, कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील, राजवीर पाटील निलंगेकर, चेअरमन दगडू सोळुंके, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शिवकुमार



चिंचमसुरे, नरसिंग बिरादार, गोविंदराव चिलकुरे, सदाशिव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले, ''महाराष्ट्रात साखर उद्योग म्हटला की ठराविक पवारदेशमुख अशीच नावे पुढे येत. परंतु ओंकार साखर ग्रुपने त्या साखर सम्राटांना मागे टाकत तब्बल एक कोटी टन ऊस क्रशिंग करून राज्यातच नव्हे तर देशात नंबर एकचा साखर समूह म्हणून ख्याती कमावली आहे. या कारखान्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा सन्मान, स्वाभिमान वाढला असून त्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती झाली आहे.

कारखाना प्रशासनाबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले.

''कारखाना आणि शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करणाऱ्या कर्मचाऱ्याची गय केली जाणार नाही. चुकीच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाते, तेव्हा त्याचा थेट फायदा शेतकरी आणि कारखान्याला होतो.''

चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्याबाबत आमदार निलंगेकर म्हणाले पुढे जाताना त्यांना अनेक अडचणी येतात, परंतु त्यांच्या पाठीशी बळीराजांचा आशीर्वाद आहे. त्यामुळे त्यांना कसलीही अडचण येणार नाही. एक टीम आणि एक परिवार म्हणून आपण त्यांच्या खंबीर पाठीशी आहोत. त्यांच्या मेहनतीमुळे आज ते १७ युनिट यशस्वीपणे चालवत आहेत. आपल्या शेजारील कर्नाटकातील भालकी येथेही त्यांचा कारखाना सुरू होत आहे. बाबुराव बोत्रे पाटील यांनी अतिशय कमी कालावधीत साखर उद्योगात गगनभरारी घेतली असून ओंकार साखर समूह देशात नंबर एक झाला आहे. याचे संपूर्ण श्रेय बाबुराव बोत्रे पाटील यांनाच जाते.

जिल्ह्यातील अतिवृष्टी संदर्भात ते म्हणाले, ''निलंगा विधानसभा मतदारसंघातील सर्वच मंडळात सरसकट पंचनाम्याचे आदेश दिले आहेत. मी स्वतः पूरग्रस्त भागात जाऊन पाहणी केली असून सर्व शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणार आहे.''

चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या आशीर्वादामुळेच ओंकार साखर कारखाना देशात नंबर एक झाला आहे. ही कामगिरी भविष्यातही सुरू ठेवू. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त फायदा मिळवून देणे हेच आमचे ध्येय आहे. निलंगेकर परिवाराने आम्हाला सदैव साथ दिली असून त्यांच्या आशीर्वादाने आज आम्ही कर्नाटक राज्यातील भालकी येथे आणखी एक नवीन युनिट सुरू करत आहोत.''

माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर यांनी शेतकऱ्यांना सल्ला दिला,

''कमी ऊस लावा पण दर्जेदार लावा. ऊसाच्या टनेजपेक्षा त्याचा दर्जा महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडविण्यासाठी हा कारखाना सदैव प्रयत्नशील राहील.''

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजप जिल्हा उपाध्यक्ष शेषराव ममाळे यांनी केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, प्रशांत पाटील, गुंडेराव जाधव, संतोष पाटील, संजय दोरवे, वीरभद्र स्वामी, डॉ. मल्लिकार्जुन संकद, मॅनेजर सतीश मोहेळकर यांच्यासह अनेक ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुद्धिबळ राज्य स्पर्धेत आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त; समृद्धी कातळे हिचे आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून कौतुक



**लातूर/प्रतिनिधी :** केवळ बुद्धिबळाच्या वेबसाइटवर सराव करीत लातूर जिल्ह्यातील रेणापूरच्या समृद्धी देवीदास कातळे हिने नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या ज्युनिअर गटातील राज्य स्पर्धेत आंतरराष्ट्रीय मानांकन मिळविले असून फिडेच्या रेटिंगमध्ये स्थान मिळविणारी पहिली लातूरची महिला खेळाडू ठरली आहे तिच्या या यशाबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

रेणापूरच्या श्रीराम विद्यालयात इयत्ता नववीत शिकणाऱ्या समृद्धी कातळे हिने बुद्धिबळ खेळात नेत्रदीपक यश मिळविले आहे. या स्पर्धेत राज्यातील ज्युनिअर गटातील १५० महिला खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. यात अनेक मातब्बर खेळाडूंचाही समावेश होता. आपल्या चाणाक्ष कौशल्याचा आधार घेत समृद्धीने प्रथमच बुद्धिबळ खेळात लातूरच्या शिरपेचात हा तुरा खोवला आहे या यशाबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी समृद्धीचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी समृद्धीचे वडील रेणापूर सोसायटीचे चेअरमन, अँड. देविदास कातळे, पत्रकार रामेश्वर बद्दर, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, चंद्रकांत कातळे, दशरथ सरवदे यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

## रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्यावतीने कुत्रा -मांजरांसाठी मोफत लसीकरण शिबीर



**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल व मातोश्री गणेश मंडळ, मेघराज नगर लातूरच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत रेबीज लसीकरण शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात कुत्रे तसेच मांजरीचे लसीकरण करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने शहरी तसेच ग्रामीण भागातील कुत्रे - मांजरींसाठी सातत्याने मोफत रेबीज लसीकरण शिबिराचा उपक्रम राबविण्यात येत आहे. कुत्रा - मांजर जरी पाळीव प्राणी असले तरी त्यांच्या लाळेपासून मानवाला विविध असाध्य व्याधींची लागण होऊ शकते. प्रसंगी आरोग्याच्या गंभीर समस्याही उदभवू शकतात. त्यामुळे रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या नूतन पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारल्यापासून हा सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमास अतिशय चांगला प्रतिसादही मिळत आहे. सध्या गणेशोत्सवाचे दिवस आहेत. गणेशोत्सवाच्या काळातही हा उपक्रम राबविण्यात आला. लातूर शहरातील मेघराज नगर परिसरातील मातोश्री गणेश मंडळाच्या सहकार्याने आयोजित केल्या गेलेल्या या लसीकरण शिबिरात अनेक पाळीव मांजर - कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले. या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, प्रकल्प प्रमुख भीमाशंकर गाढवे, जिल्हा सर्व पशु चिकित्सालयाचे डॉ. साळवे, श्री मातोश्री गणेश मंडळाचे अध्यक्ष गणेश दाडगे, उपाध्यक्ष भालचंद्र गिरी, सचिव राहुल गोरे, गिरीश ब्याळे, चंद्रकांत गुंडरे, विनोद पंडगे, लक्ष्मीकांत गौड, मिलिंद अंबेकर, मेहुल कामदार, राजगोपाल मुंदडा, मुंडे, साहेबराव मोरे, सर्पमित्र श्याम सुरवसे आदींची उपस्थिती होती.

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना, शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्जाची अंतिम तारीख १८ सप्टेंबर

**लातूर/प्रतिनिधी :** इतर मागासवर्गीय,विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ०१ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर, २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत. लातूर प्रादेशिक विभागातील लातूर, धाराशिव, नांदेड व हिंगोली जिल्ह्यांतील शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी इच्छूक विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित कार्यालयात सादर करावेत,असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभागाचे उपसंचालक डॉ.तेजस माळवदकर यांनी केले आहे. बारावी नंतरचे बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास (बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित प्रवर्गनिहाय विहीत आरक्षणानुसार तसेच गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येणार आहे. वसतिगृह प्रवेशसाठी ०१ ते १८ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत अर्ज करावयाचा आहे. अर्जाची छाननी १९ ते २४ दरम्यान होईल. पहिली निवड गुणवत्तेनुसार यादी २५ सप्टेंबर, २०२५ रोजी तर त्यानुसार प्रवेशाची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर, २०२५ आहे. दुसरी निवड यादी ०९ आक्टोबर, २०२५ रोजी प्रसिद्ध होणार असून प्रवेशासाठी अंतिम मुदत १७ ऑक्टोबर २०२५ असेल. वसतिगृहात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना निवास, भोजन व अन्य सुविधा मोफत दिल्या जातात. शासकीय वसतिगृहासाठी पात्र असलेल्या तथापि गुणवत्तेनुसार व वसतिगृहाच्या क्षमतेअभावी वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पंडीत दिनदयाळ स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी विचारात घेतले जातील, असे लातूर इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक)विभागाने कळविले आहे.अधिक माहितीसाठी rddbahujanklatur@gmail.com या ई-मेलवर किंवा ०२३८२-२९९६५५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## खा. आशोकराव चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत
## १४ सप्टेंबर रोजी लातूर येथे भाजपा कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा, जिल्हाध्यक्षांचा सत्कार सोहळा

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने भाजपाचे नुतन ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री. बस्वराज पाटील यांचा जाहीर सत्कार आणि मतदार संघातील कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. आशोकराव चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत येत्या १४ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी आयोजीत करण्यात अला असल्याची माहीती भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

भारतीय जनता पार्टीचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी माजी मंत्री बस्वराज पाटील यांची नुक्तीच प्रदेश भाजपा पक्ष श्रेष्ठीच्या वतीने निवड करण्यात आली असून त्यांचा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने राज्याचे माजी मुख्यमंत्री भाजपाचे नेते खा. आशोकराव चव्हाण यांच्या शुभहस्ते जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. या सत्कार सोहळयाच्या निमित्ताने लातूर





ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांचा भव्य संकल्प मेळावा आयोजीत करण्यात आला आहे.

संकल्प मेळावा आणि सत्कार सोहळा या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड हे भुषविणार आहेत. तर यावेळी राज्य कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल, जिल्हायाचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, गोपीनाथ मुंडे ऊस तोड कामगार मंडळाचे अध्यक्ष श्री. गोविंद अण्णा केंद्रे, माजी आमदार श्री. शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, माजी जिल्हाध्यक्ष श्री. दिलीपराव देशमूख यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदरील संकल्प मेळावा आणि सत्कार सोहळा येत्या १४ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी दुपारी २ वाजता लातूर येथील विश्व पॅलेस मंगल कार्यालयात होणार असून या मेळाव्यास लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते बंधू भगिनींनी बहूसंख्येनी उपस्थित राहावे असे आवाहन मतदार संघातील भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, शरद दरेकर आणि उध्दव काळे यांनी केले आहे.

## ठाण्यात शिंदे गटाच्या कार्यकर्त्याची निर्घृण हत्या, गाडीखाली चिरडून मारले!

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात म्हणजेच ठाण्यात शिंदे गटाच्या कार्यकर्त्याची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ठाण्यातील वागळे इस्टेट येथील आयटी सर्कल येथे काल रात्री १० च्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणाने सध्या संपूर्ण ठाण्याला धक्का बसला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संतोष पवार उर्फ 'संत्या' याने गाडीखाली चिरडून या कार्यकर्त्याची हत्या केली. हल्लेखोराने डोक्यावरून आणि छातीवरून गाडी नेऊन त्याचा जीव घेतला. संतोष पवारवर याआधीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हत्या करण्यात आलेल्या तरुणाचे नाव विठ्ठल गायकर असं आहे.

# ऑगस्ट महिन्यात पूर्ण क्षमतेने भरले माकणीतील निम्न तेरणा प्रकल्पाचे जलपूजन सोहळा पारंपरिक पद्धतीने संपन्न!

## कामकाजाबाबत महत्त्वाची माहिती ; तालुक्याच्या शेतकऱ्यांसाठी दिलासा..

**औसा/प्रतिनिधी :** सततधार पावसाने भरलेल्या लोहारा, औसा तालुक्यातील सीमावरील माकणी, मातोळा गावालगतचा निम्न तेरणा प्रकल्पाच्या जलसाठ्याचा जलपूजन सोहळा संपन्न झाला असून याप्रसंगी प्रकल्पाच्या कामकाजाबाबत महत्त्वाची माहिती देण्यात आली धाराशिव लातूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे ऑगस्ट महिन्यातच हा प्रकल्प भरला असून या जलसाठ्यात वाढ झाल्याने परिसरातील दोन्ही जिह्यातील सिंचनाच्या दृष्टीने शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा मिळाला आहे.

दि. ०२ सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी निम्न तेरणा प्रकल्पाच्या जलसाठ्याचे पूजन पारंपरिक समारंभाने आयोजित करण्यात आले होते याप्रसंगी धाराशिव (उस्मानाबाद) लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर व उमरगा लोहारा मतदार संघाचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते निम्न तेरणा प्रकल्पाच्या जलसाठ्याचे जलपूजन करण्यात आले असून, या कार्यक्रमास कार्यकारी अभियंता अमर पाटील, उपविभागीय अधिकारी नितीन बी पाटील उपस्थित होते. यावेळी प्रकल्पाच्या कामाच्या अद्ययावत स्थितीबाबतही महत्त्वाची माहिती दिली आहे. माकणी येथील निम्न तेरणा प्रकल्पाचे जलसाठे यंदा पावसामुळे पूर्ण क्षमतेने भरले असून, यामुळे प्रवाही व उपसा सिंचनासाठी आणि ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्यासाठी मोठी उपलब्धता निर्माण झाली आहे. खासदारांनी व आमदारांनी प्रकल्पाच्या साठ्याबाबत व द्वार परिचलन, यांत्रिकी यंत्रणा व जलविद्युत यंत्रणा बाबत कार्यकारी अभियंता यांच्याशी चर्चा केली व यांत्रिकी व जलविद्युत विभागाच्या कामाबाबत काही अडचणी असल्यास अवगत करण्यात यावे असे प्रकल्प स्थळी सूचित केले. सदर जलपूजन समारंभात जलस्रोतांच्या महत्त्वावर भर देण्यात आला, तसेच शेतकरी आणि परिसरातील रहिवाशांसाठी प्रकल्पाचे फायदे स्पष्ट करण्यात आले. गेल्या काही महिन्यांत झालेल्या अतिवृष्टी मुळे हा जलसाठा १०० % टक्क्यांपर्यंत भरला असून, याचा फायदा लोहारा, उमरगा, औसा तसेच निलंगा तालुक्यातील नागरिकांना मिळणार आहे. या प्रकल्पामुळे सिंचनाच्या क्षेत्राचा विस्तार होऊन शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी आवश्यक असलेली पाणीव्यवस्था सुलभ होईल, तसेच दैनंदिन पाण्याच्या गरजाही पूर्ण होतील. जलसाठा वाढल्यामुळे प्रकल्पाच्या कामकाजात गती आलेली आहे.या प्रकल्पाच्या नियमित देखभालीकडे प्रशासनाने योग्य ती दक्षता घ्यावी, सोबत पूर नियंत्रण बाबत कक्ष अद्यावत असावा सर्व विभागाचे अधिकारी यांनी सतत तपासणी करत राहून धरण सुरक्षा बाबत लक्ष द्यावे तसेच जलसंपदा विभागाने जलसाठा जास्त काळ टिकून राहावा यासाठी सतत निगराणी ठेवण्यात यावी. एकंदरीत,निम्न तेरणा प्रकल्पाच्या जलसाठ्याच्या पूजनामुळे क्षेत्रातील शेतकरी वर्गात समाधान आणि नवी उमेद निर्माण झाली आहे. यावेळी कार्यकारी अभियंता अमर पाटील, उपविभागीयअधिकारी एन बी पाटील व शाखाधिकारी एस बी गंभीरे व निम्न तेरणा प्रकल्पाचे सर्व कर्मचारी हजर होते. जलपूजन कार्यक्रम यशस्वी पार पाडल्या बद्दल माकणी सरपंच तसेच उद्योजक शुभम साठे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.



## अनोळखी मयताबाबत माहिती देण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील विवेकानंद चौक पोलीस स्टेशन अंतर्गत कोळपा तांडा येथे रेल्वे पटरीवर ३० ऑगस्ट २०२५ रोजी अज्ञात रेल्वेने अपघात होवून पडल्याचे आढळून आले होते. त्याला लातूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता, त्याला वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले. या मयताचा मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन करून प्रेत शीतगृहात ठेवण्यात आले आहे

मयताचे वय अंदाजे ३० वर्षे असून रंग गोरा, उंची अंदाजे ५ फुट ६ इंच, सडपातळ बांधा, सरळ नाक, अंगात मळकट झालेला पांढरा शर्ट व काळ्या रंगाची हाफपँट आहे. तरी या वर्णनाचा व्यक्तीबाबत काही माहिती मिळाल्यास लातूर येथील विवेकानंद चौक पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक एस.एस. पाटील (मो.क्र. ९९२३८७१९९९), पोलीस चौकशी अधिकारी एन. एन. वाघमारे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०१

# प्रारूप प्रभाग रचनेवर तब्बल ४४ हरकती, सर्वाधिक ३४ जिजामातानगर प्रभागामध्ये, पालिकेची सार्वत्रिक निवडणूक

तुळजापूर (प्रतिनिधी)-पालिकेचा सार्वत्रिक निवडणुकीसाठी सादर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर तब्बल ४४ हरकती घेण्यात आल्या आहेत. यात सर्वाधिक ३४ हरकती जिजामातानगर प्रभागात घेण्यात आल्या आहेत. दरम्यान सादर करण्यात आलेल्या हरकतींवर बुधवारी (दि. ३) सुनावणी घेण्यात येणार असल्याचे पालिकेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांनी सांगितले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर गेल्या चार वर्षांपासून रखडलेल्या पालिका निवडणुकीचा प्रक्रियेला गती आली असून, नगर विकास विभागाचा १० जून रोजीचा प्रभाग रचनेसंदर्भातील आदेशानुसार १८ ऑगस्ट रोजी प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली होती. या प्रारूप प्रभाग रचनेवर ३१ ऑगस्ट अंतिम मुदतीपर्यंत एकूण ४४ हरकती सादर करण्यात आल्या. यात सर्वाधिक हरकती प्रभाग तीनवर ३४ हरकती घेण्यात आल्या आहेत.

या शिवाय इतर प्रभागात एखाद - दुसरी हरकत घेण्यात आली असून, काहींनी अनेक प्रभागावर कॉमनमध्ये हरकती घेण्यात आल्या आहेत. शिवाय तुळजापूर शहरात एकूण ११ प्रभाग असणार आहेत. या प्रारूप प्रभाग रचनेमध्ये पहिले १० प्रभागांमध्ये द्विसदस्यीय तर शेवटचा ११ नंबर प्रभागामध्ये त्रिसदस्यीय प्रभाग रचना असणार आहे.

११ प्रभाग, सर्व द्विसदस्यीय; ११ वा त्रीसदस्यीय एकूण ११ प्रभाग असणार आहेत. यामध्ये पहिले १० प्रभाग द्विसदस्यीय तर शेवटचा ११ वा प्रभाग त्रीसदस्यीय असणार आहे. प्रभागात लोक संख्या २७०० ते ३२०० असणार आहे. ११ व्या प्रभागात ४८०० लोकसंख्या असणार आहे. विशेष म्हणजे २०२२ चीच प्रभाग रचना कायम ठेवण्यात आली असून केवळ सिमेवरील स्थळे, घराची नावे बदलण्यात आली आहे.

# गोवंश हत्या बंदी कायदा रद्द करावा: कुरेशी समाज, शेतकरी व वाहनचालकांसह शेकडो नागरिक सहभागी



लोहारा (प्रतिनिधी)-शेतकरी कर्जमाफी करून शेतकऱ्यांना आधार द्यावा, गोवंश हत्या बंदी कायदा २०१५ रद्द करावा. शेतकऱ्यांकडे भाकड जनावरे अधिक आहेत. ती सांभाळणे अडचणीचे होत आहे. तथाकथित गोरक्षकाकडून होत असलेली अडवणूक व कायदा हातात घेऊन चालवलेली लूटमार अत्याचार ताबडतोब बंद व्हावी, अशी मागणी करत लोहारा तालुक्यातील शेतकरी, कुरेशी समाज, व्यापारी व वाहन चालक यांच्या वतीने मंगळवारी (दि. २) मूक मोर्चा काढण्यात आला. या वेळी लोहारा तहसीलदारांनी निवेदन स्वीकारले.

लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून तहसील कार्यालयापर्यंत हा मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात तालुक्यातील कुरेशी समाज बांधव, शेतकरी, वाहन चालक, व्यापारी, युवक, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मूक मोर्चाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले, महाराष्ट्रात गोवंश हत्या बंदी कायदा २०१५ लागू झाला. तेव्हापासूनच महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या भाकड जनावरांचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. या भाकड जनावरांच्या मोठ्या प्रमाणात खरेदी विक्रीचा व्यवसाय होतो. त्यामध्ये महाराष्ट्रातील कुरेशी समाज व व्यापारी यांचा प्रामुख्याने समावेश आहे. त्यांच्याकडे खरेदी विक्रीचे नायब तहसीलदार अनिल अहिरे यांनी हे निवेदन स्वीकारले. या मूक मोर्चात मसूद शेख, आयुब शेख, खलिफा कुरेशी, अमीन सुंबेकर, अभिमान खराडे, रविकिरण बनसोडे, हणमंत जगताप आदींसह शेकडो नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते. सूत्रसंचालन शब्बीर गवंडी यांनी केले.

गोरक्षकांकडून होणारे अत्याचार बंद व्हावेत शेतकरी कर्जमाफी करून शेतकऱ्यांना आधार द्यावा, गोवंश हत्या बंदी कायदा २०१५ रद्द करावा, तथाकथित गोरक्षकाकडून होत असलेली अडवणूक व कायदा हातात घेऊन चालवलेली लूटमार अत्याचार ताबडतोब बंद व्हावेत, महाराष्ट्रामध्ये जी जनावरे परमिटेड (परवानाधारक) आहेत. त्यांच्यासाठी राज्यातील प्रत्येक नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात अद्ययावत असे कत्तलखाने शासनाकडून उपलब्ध करून देण्यात यावेत, आदी मागण्या या मूकमोर्चाद्वारे करण्यात आल्या.

# उमरगा जनता बँकेतील गणरायाची महाआरती



मुरूम (सुधीर पंचगल्ले)- उमरगा जनता बँकेतील बुध्दीचे आराध्य दैवत श्री गणरायाची बुधवारी (दि.३) आरती बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील व तहसीलदार गोविंद येरमे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी बँकेचे व्हा. चेअरमन विरसंगप्पा आळंगे, संचालक विनय बदोले, ड. संजय बिराजदार, रफीक तांबोळी, भरत मारेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अमित भरडे, श्री विठ्ठलसाई कारखान्याचे संचालक राजीव हेबळे, दिलीप भालेराव, मल्लिनाथ दंडगे, माजी सभापती सचिन पाटील, मनिष माणिकवार, प्राचार्य श्रीराम पेठकर, ड. उदय वैद्य, शंकर पाटील, रविंद्र ढंगे, अनिल सगर, राहुल हेबळे, प्रा. शौकत पटेल, परमेश्वर टोपगे, महेश माशाळकर, चंद्रशेखर पवार, विक्रम मस्के, यशपाल कांबळे आदीसह शाखाधिकारी, सभासद व कर्मचारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा विविध क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन



धाराशिव (जिमाका) - हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे उत्साहात साजरा करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर दि.२५ ते २९ ऑगस्ट या कालावधीत दोरी उड्या, जिम्नॅस्टिक्स,लिंबू चमचा, रोपस्कीपिंग,योगा,१०० मी.व २०० मी.धावणे,कराटे,तलवारबाजी, लेझीम,लाठीकाठी,शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची बॅडमिंटन स्पर्धा आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

२९ ऑगस्ट रोजी श्रीपतराव भोसले माध्यमिक विद्यालय, धाराशिव येथे मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.या प्रसंगी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे उपाध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कारार्थी डॉ. चंद्रजित जाधव,पोलीस उपअधिक्षक अश्विनी भोसले,प्रशासकीय अधिकारी डॉ.मंजुळा पाटील,माजी उपसंचालक (क्रीडा व युवक सेवा) जनक टेकाळे,जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे,प्राचार्य नंदकुमार ननवरे,उपमुख्याध्यापक प्रमोद कदम,क्रीडा शिक्षक विक्रम सांडसे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रीय खेळाडू तन्वी भोसले हिने सर्व मान्यवर व खेळाडूंना शपथ दिली. तसेच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तालुका क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी, क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, मार्गदर्शक डॉ.शुभांगी रोकडे,डिंपल ठाकरे,विश्वास खंदारे,सुरेश वालवडकर,सुनिल घोगरे,किशोर भोकरे,सुरेश कळमकर व व्यंकटेश दंडे यांनी परिश्रम घेतले.


**लातूर समाचार उस्मानाबाद**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


# लोहारा तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे झाले मोठे नुकसान





लोहारा - सतत कोसळणाऱ्या अवकाळी व अतिवृष्टीमुळे लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, मूग व इतर पिकासह जवळपास सर्व पिके पाण्यात बुडून गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. अनेकांच्या शेतात उभे पीक पूर्णतः उद्धस्त झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. यासोबतच शेतकऱ्यांची घरे, जनावरे, गोठे व शेतमाल साठवणही पाण्याखाली गेल्याने ग्रामीण भागात हाहाकार माजला आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून पंचनामे सुरू करण्यात आल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात ही प्रक्रिया फार्स ठरत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ढिसाळ पद्धतीमुळे पंचनामे वेळेत होत नाहीत, त्याची माहिती सर्व शेतकऱ्यांना दिली जात नाही, पंचनामे झाले तरी वास्तव नुकसानाचे योग्य मूल्यमापन होत नसल्याने शेतकऱ्यांच्या मनात तीव्र संताप निर्माण झाला आहे. शेतात उभ्या पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले आहे, पण पंचनाम्यात किती टके नुकसान दाखवले जाते. हे कळत नाही.

शेतकऱ्यांना स्वतःचा शेतातील फोटो काढून तलाठी कार्यालयात जमा करण्याचे सांगितले गेले, पण संपूर्ण शेतकऱ्यांना ही माहितीच नसल्याने शेकडो शेतकऱ्यांना फोटो देता आले नाहीत. पाऊस सर्वत्र पडलेला असल्यामुळे नुकसानही सर्वच शेतकऱ्यांचे झाले आहे. पंचनामा व कागदपत्रांचा खेळ कशासाठी खेळला जात आहे. याबद्दल संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

शेतकऱ्यांचा प्रश्न आता फक्त पिकांच्या नुकसानापुरता राहिलेला नाही, तर जीवनावश्यक प्रश्न बनला आहे. बँकांचे हप्ते कसे फेडायचे? जनावरांना चारा कुठून आणायचा? मुलांचे शिक्षण कसे करायचे? असे सवाल पीडित शेतकरी करत आहेत, सरकारकडून मदत केव्हा जाहीर होईल, याबाबत संभ्रमच आहे. मात्र पंचनामे व शासकीय प्रक्रिया यामुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या हाती मदत पोहोचण्यासाठी वेळ लागू नये.

# ओबीसी, विमुक्त-भटक्या व विशेष मागास विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रिया सुरु

धाराशिव, (जिमाका)- इतर मागास प्रवर्ग (ओबीसी),विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश व शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे.या अंतर्गत शासकीय वसतिगृह,ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना राबविण्यात येणार आहेत.

जिल्ह्यात मुला-मुलींसाठी प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांची क्षमता असलेले शासकीय वसतिगृह सुरू करण्यात आले आहे.इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत.

शासकीय वसतिगृह असलेल्या जिल्ह्यांसाठी वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे. अर्ज भरण्याची मुदत : ०१ सप्टेंबर २०२५ ते १८ सप्टेंबर २०२५ दरम्यान आहे.अर्ज छाननी : १९.सप्टेंबर २०२५ ते २४ सप्टेंबर २०२५ दरम्यान आहे.पहिली निवड यादी : २५ सप्टेंबर २०२५.पहिल्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत : ०६. ऑक्टोबर २०२५ आहे. दुसरी निवड यादी : ०९ ऑक्टोबर २०२५. दुसऱ्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत : १७ ऑक्टोबर २०२५ आहे. शासकीय वसतिगृह नसलेल्या जिल्ह्यांसाठी वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.अर्ज भरण्याची मुदत : ०१ ऑक्टोबर २०२५ ते १८ ऑक्टोबर २०२५ आहे.अर्ज छाननी : २४ ऑक्टोबर २०२५ ते ३० ऑक्टोबर २०२५ दरम्यान आहे.पहिली निवड यादी : ३१ ऑक्टोबर २०२५.पहिल्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत : १० नोव्हेंबर २०२५. दुसरी निवड यादी : १३ नोव्हेंबर २०२५.दुसऱ्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत : २१ नोव्हेंबर २०२५ ही आहे. शासकीय वसतिगृहासाठी पात्र ठरलेले परंतु क्षमतेअभावी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना अंतर्गत विचारात घेतले जाणार आहेत.या योजना व वसतिगृह प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी वेळापत्रकानुसार ऑनलाइन अर्ज करावेत,असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक अमोल ताकभाते यांनी केले आहे.

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत रा. अमृतनगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.२६.०८.२०२५ रोजी अमृतनगर धाराशिव येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विमल पान मसाला ३६ पुढे, बादशाहा गुटखा १३५ पुडे, व्हि १ तंबाखु ३६ पुढे, असा एकुण २५,६५० किंमतीचे विक्री करीत जवळ बाळगुन अन्न व सुरक्षा आयुक्त अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेशाचे उल्लंघन करत असताना अन्न व सुरक्षा अधिकारी यांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649